cmyk

## संपादकीय

### रा.स्व.संघाची कान टोचणी कामी येईल

औरंगजेबाचा मुद्दा सध्या संयुक्तिक नसून राष्ट्रीय स्वयंसेवक संघ कुठल्याही प्रकारच्या हिंसाचाराचे समर्थन करत नाही, अशा स्पष्ट शब्दांत संघाचे अखिल भारतीय प्रचार प्रमुख सुनील आंबेकर यांनी महाराष्ट्रात सुरू असलेला औरंगजेबाचा मुद्दा आणि नागपूरमध्ये घडलेल्या हिंसाचारावर संघाची भूमिका स्पष्ट केली. तसेच कबर पाडण्याच्या मागणीपासून संघाने स्वत:ला दूर ठेवले. संघाच्या या भूमिकेमुळे विश्व हिंदू परिषद आणि बजरंग दल तोंडघशी पडल्याची चर्चा आहे.


# दैनिक राज्य लोकतंत्र

www.epaper.rajyaloktantra.com नवी दिशा... नवे विचार..... email:rajyaloktantra75@gmail.com

बीड – महाराष्ट्र | वर्ष – ४ | अंक–३२६ | शुक्रवार, दि.२१ मार्च २०२५ | RNI No.: MAHMAR/2021/85884 | NO.L SB/BEED/RNP-206/2024-26 | पाने– ६ | किंमत ३ रूपये


### प्रशांत कोरटकरच्या घरावर कोल्हापूर पोलिसांचा छापा

नागपूरः कोल्हापूर येथील प्रसिद्ध इतिहास संशोधक इंद्रजित सावंत यांना धमकी देत, छत्रपती शिवाजी महाराज आणि छत्रपती संभाजी महाराज यांच्याबद्दल आक्षेपार्ह विधान केल्याप्रकरणी कोल्हापूर पोलिसांनी फरार असलेल्या प्रशांत कोरटकरच्या बेसा येथील घरी गुरूवारी (दि. २०) छापा टाकला. यावेळी कोल्हापूर पोलिसांनी पत्नीची चौकशी करीत, त्यांचे जबाब नोंदविले. प्रशांत कोरटकर याच्यावर कोल्हापुरात गुन्हा दाखल आहे. यापूर्वी त्याच्या शोधासाठी २७ फेब्रुवारीला कोल्हापूर पोलिस नागपुरात येऊन गेले. यावेळी पोलिसांनी रायपूर, छत्तीसगढ आणि वर्ध्यातील हिंगणघाटमध्ये त्याचा शोध घेतला. त्यानंतर १ मार्चला बेलतरोडी पोलिसांनीही कोरटकरविरुद्ध गुन्हा दाखल केला.

# पंजाबमध्ये शेतकरी -पोलिसांमध्ये तणाव!

## शेतकरी आक्रमक; शेकडो शेतकऱ्यांसह डल्लेवाल आणि पंढेर ताब्यात



नवी दिल्ली । वृतसंस्था

शेतकरी नेते जगजीत सिंग डल्लेवाल यांच्या गावात फरीदकोटमध्ये गुरुवारी (दि.२०) पोलिस आणि शेतकरी यांच्यात तणाव निर्माण झाला. शेतकऱ्यांनी राष्ट्रीय महामार्ग ५४ वर आंदोलन सुरू केल्यावर पोलिसांनी शेकडो शेतकऱ्यांसह डल्लेवाल आणि पंढेर यांनी जबरदस्तीने ताब्यात घेतले. फरीदकोट जिल्ह्यात विविध स्थानांहून सुमारे ६०० शेतकऱ्यांना पोलिसांनी ताब्यात घेतले असून, त्यात महिलाही आहेत. यामध्ये भारतीय किसान युनियन एकता सिद्धपुर डल्लेवाल गटाचे शेतकऱ्यांची संख्या आधिक आहे.

पोलिसांच्या या कारवाईमुळे शेतकऱ्यांमध्ये तीव्र संताप झाला आहे आणि त्यांनी केंद्र व पंजाब सरकारच्या विरोधात निषेध व्यक्त करत आहेत. यावरून पोलिसांनी मात्र कठोर पावले उचलण्याचा इशारा दिला. जो कोणी महामार्ग बंद करण्याचा प्रयत्न करेल, त्याला अटक केली जाईल, असा इशारा पोलिसांनी दिला आहे. कुठल्याही परिस्थितीत महामार्ग बंद होऊ दिला जाणार नाही आणि सामान्य नागरिकांना त्रास होऊ देऊ नका. असे पोलिसांनी आवाहन केले आहे. तर शेतकऱ्यांनी मात्र पोलिसांच्या कारवाईचा निषेध केला आहे. शेतकऱ्यांनी सांगितले की, पंजाब सरकारने रात्री केलेली कारवाई अत्यंत निंदनीय आहे. डल्लेवाल यांना आंदोलनाच्या ठिकाणावरून उचलल्यामुळे शेतकऱ्यांमध्ये प्रचंड रोष आहे. तसेच ५०० ते ६०० शेतकऱ्यांना अटक केल्याची बातमी किसान तकने दिली आहे. पोलिस अधिकाऱ्यांनी या कारवाईचे स्पष्टीकरण दिले. फरीदकोट येथील ◀◀ पान २ वर

## छत्तीसगडमध्ये ३० नक्षलवाद्यांचा खात्मा, एक जवान शहीद

विजापूर । वृतसंस्थत्त

**छत्तीसगडमधील विजापूर आणि कांकेर जिल्ह्यात सुरक्षा दलांनी मोठे यश मिळवले असून, दोन वेगवेगळ्या चकमकींमध्ये एकूण ३० नक्षलवाद्यांचा खात्मा करण्यात आला आहे. या कारवाईमुळे परिसरात मोठी खळबळ उडाली असून, नक्षल चळवळीला मोठा धक्का बसल्याचे मानले जात आहे.**

विजापूर जिल्ह्यात सुरक्षा दल आणि नक्षलवाद्यांमध्ये जोरदार चकमक उडाली. गुप्तचर माहितीच्या आधारे सुरक्षा दलांनी नक्षलवाद्यांच्या हालचालींवर लक्ष ठेवले होते. यादरम्यान जंगलामध्ये शोधमोहीम राबवताना नक्षलवाद्यांनी अचानक गोळीबार सुरू केला. प्रत्युत्तरात सुरक्षा दलांनी जोरदार प्रत्युत्तर देत ३० नक्षलवाद्यांचा खात्मा केला. या चकमकीमध्ये एका सुरक्षा दलाचा जवान शहीद झाला आहे. ही कारवाई अत्यंत महत्त्वाची मानली जात असून, दोन्ही ठिकाणी मोठ्या प्रमाणावर शस्त्रसाठा आणि दारूगोळा जप्त करण्यात आला आहे.

# दिशा सालियन प्रकरण पुन्हा चर्चेत!

## नितेश राणेंनी घेतले आदित्य ठाकरेंचे नाव



मुंबई । प्रतिनिधी

**दिशा सालियनच्या वडिलांनी याचिका दाखल केली आहे, त्यानुसार आम्ही सभागृहात एवढी मागणी केली आहे की, बहिणीवर आमच्या बलात्कार होतो, त्यामध्ये जे आरोपी आहेत, त्यांना ताब्यात घ्यावे, चौकशी करावी, अटक करावी. सरकारने या सगळ्या प्रकरणाची दखल घ्यावी. असे म्हणत नितेश राणे यांनी आदित्य ठाकरेंवर हल्लाबोल केला आहे. ते म्हणाले, ''मी पहिल्या दिवसांपासून म्हणत होतो की, ही हत्या आहे आणि याचा तपास व्हायला हवा. यामध्ये आदित्य ठाकरेंच्या भूमिकेचाही तपास व्हायला हवा. पहिल्या दिवसापासून मी त्या लोकांच्या नावांचीही चौकशीची मागणी केली होती, ज्याचे नाव आता सतीश सालियानने आपल्या याचिकेत घेतले आहे.**

नितेश राणे पुढे म्हणाले, तिच्या वडिलांनी तीन नाव दिले आहेत, त्यांना अटक करावी अशी मागणी आम्ही केली. आपला देश कायद्यानुसार चालतो आणि कायद्यानुसार ही अटक व्हायला हवी. लाडक्या बहिणींना सुरक्षा देणे गरजेचे आहे. आदित्य ठाकरे आमदार आहेत. नैतिकता म्हणून केवळ ◀◀ पान २ वर

### “ सत्ताधारी, विरोधक आमने–सामने

दिशाचे वडील सतीश सालियन यांनी याचिकेत शिवसेना नेते आदित्य ठाकरे, अभिनेता सूरज पांचोली, दिनो मोरीयो यांच्यासह मुंबई पोलिसांवर या गंभीर आरोप केले आहेत. या प्रकरणाचे पडसाद गुरुवारी विधानसभा अधिवेशना दरम्यान उमटले. यावरुन विधान भवनाच्या पायऱ्यांवर सत्ताधारी, विरोधक आमने–सामने आले. सत्ताधाऱ्यांकडून दिशा सालियन मुद्द्यावरून घोषणाबाजी करण्यात आली. दबाव आणला कशाला, न्याय हवा दिशाला असे लिहिलेले फलक हातात घेऊन सताधाऱ्यांनी विधानभवनाच्या पायऱ्यावर आंदोलन केले. यावर बोलताना विधान परिषदेचे विरोधी पक्षनेते अंबादास दानवे म्हणाले की, दिशा सालियन प्रकरण हे न्याय प्रविष्ट आहे. न्यायालय यावर योग्य तो निर्णय देईल. शिळ्या कडीला सारखा ऊत आणण्याचा प्रयत्न भाजपकडून होत आहे.

### “ ५ वर्षांनंतर दिशा सालियनच्या अंत्यविधीचे फोटो समोर, चेहऱ्यावर एकही जखम नाही

दिवंगत अभिनेता सुशांत सिंह राजपूत याची माजी व्यवस्थापक दिशा सालियनच्या अंत्यविधीचे पाच वर्षांनंतर फोटो समोर आले आहेत. विशेष म्हणजे, चेहऱ्यावर एकही जखम दिसत नसल्याने आश्चर्य व्यक्त होत आहे. दिशाने १४ व्या मजल्यावरून उडी मारून आपले जीवन संपवले होते. मालाड येथील राहत्या घरातून तिने उडी मारून आयुष्य संपवले होते, पण, दिशाचा मृत्यू उडी मारून नव्हे तर तिची सामूहिक बलात्कार करून हत्या केल्याचा आरोप तिचे वडील सतीश सालियन यांनी आता केला आहे.

## सीबीएसई पॅटर्न यंदाच्या वर्षी फक्त पहिलीलाच, कुठलीही फी वाढ नाही

मुंबईः राज्यातील राज्य शिक्षण मंडळांच्या शाळांना सीबीएसई अभ्यासक्रम लागू करण्यासंदर्भात सूचना देण्यात आल्या आहेत. विशेष म्हणजे यंदाच्या शैक्षणिक वर्षापासूनच स्टेट बोर्ड शाळेतील विद्यार्थ्यांच्या अभ्यासक्रमात सीबीएससी पॅटर्न लागू करण्यात येत आहे.

शैक्षणिक वर्ष २०२५–२०२६ या वर्षापासून सीबीएससी पॅटर्न लागू होणार असून यंदाच्यावर्षी केवळ इयत्ता पहिलासाठी हा पॅटर्न लागू होणार आहे. त्यामुळे, पहिल्या फेजमध्ये शिक्षण विभागाकडून केवळ पहिलीच्या वर्गासाठी सीबीएससी पॅटर्न लागू होणार असून पुढच्या वर्षी दोन टप्प्यात दुसरी आणि तिसरी, चौथीसाठी लागू ◀◀ पान २ वर

## नागपूर हिंसाचार:फहीम खानसह ६ जणांवर देशद्रोहाचा गुन्हा दाखल





नागपूर । प्रतिनिधी

**पोलिसांवर झालेली दगडफेक ग्लोरिफाय केली होती. त्यासोबत अल्लाहू अकबर, सर तनसे जुदा असे कॅप्शन टाकलेले आहेत. हे सर्व हिंसाचाराला बढावा देण्यासाठी अशा प्रकारच्या पोस्ट करण्यात आल्या. अशा लोकांवर देशद्रोहाचे कलम लावण्यात येईल. आतापर्यंत ६ आरोपींवर देशद्रोहाचा गुन्हा दाखल केलेला आहे. त्यामध्ये फहीम खानचाही समावेश आहे.**

देशद्रोहाचा गुन्ह्यात आणखी आरोपींचा समावेश होईल, असे लोहित मतानी यांनी सांगितले. ◀◀ पान २ वर

## ज्येष्ठ शिल्पकार राम सुतार यांना २०२४ चा महाराष्ट्र भूषण पुरस्कार जाहीर



मुंबई । प्रतिनिधी

**महाराष्ट्राचा सर्वोच्च नागरी पुरस्कार असलेला २०२४ चा महाराष्ट्र भूषण पुरस्कार ज्येष्ठ शिल्पकार राम सुतार यांना जाहीर झाला आहे, अशी घोषणा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विधानसभेत केली.**

याबाबत दिलेल्या निवेदनात मुख्यमंत्री म्हणाले, ◀◀ पान २ वर

## विधीमंडळात सभापती, अध्यक्षांकडून पक्षपातीपणा; विरोधी आमदारांचे राज्यपालांना निवेदन



मुंबई । प्रतिनिधी

**सत्ताधारी पक्षाला साथ देऊन नियमबाह्य पद्धतीने काम करणाऱ्या सभापती आणि अध्यक्षांविरोधात महाविकास आघाडीच्या आमदारांनी गुरूवारी (दि. २०) राज भवन येथे राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन यांची भेट घेऊन निवेदन दिले.**

संसदीय प्रणालीमध्ये विरोधी पक्ष हा एक महत्त्वाचा घटक आहे. त्यांची भूमिका ही सरकारविरोधी नसून सरकारच्या निर्णयावर आणि धोरणांवर अंकुश ठेवणारी आहे. आवश्यक तेथे टीका करणे ◀◀ पान २ वर

## धान्य चोरी करणारी टोळी पकडली

### १०, लाखाचा मुद्येमाल जप्त; स्थानिक गुन्हे शाखेची कारवाई



जालना । प्रतिनिधी

**जालना जिल्ह्यात शेती माल पिक ज्यात प्रामुख्याने सोयाबीन, हरबरा, गहु. तुरी या धान्य पिकाचे चोरी चे गुन्हे उपडकीस करण्यासाठी पोलीस अधीक्षक अजय कुमास बंसल, यांनी स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक श्री. पंकज जाधव व पथकास सुचना दिल्या होत्या.**

त्यावरुन पोलीस निरीक्षक श्री. पंकज जाधव स्वागुशा जालना यांचे मार्गदर्शनाखाली स्थागुशाचे पथक तयार करुन कारवाई करण्या बाबत मार्गदर्शन केले होते त्या अनुषंगाने दिनांक १९/०३/२०२५ रोजी स्थागुशा येथील पथक धान्य पिकाचो चोरी करणारे गुन्हेगारां बाबत माहिती घेत असतांना त्यांना गुप्त बातमीदार व तांत्रिक विश्लेषण आधारे माहिती मिळाली की, पोलीस ठाणे जाफ्राबाद हद्यतील मौजे मसरुळ शिवात जाफ्राबाद ते माहोरा रोडवरील पत्राचे गोडावून येथील सोयाबीन चोरी हो बळीराम रावसाहेब फुके रा. उमरखेडा ता. भोकरदन याने त्याचे साथीदारासह केल्याची खात्रीलायक माहिती मिळाली. त्यावरुन सदर पथकाने बळीराम रावसाहेब फुके वय २३ वर्षे, रा. उंमरखेडा, ता. भोकरदन बाचा शोध घेऊन त्यास दिनांक १९:०३/२०२५ रोजी मौजे लोणगाव येथुन ताब्यात घेतले. त्यास गुन्ह्याच्या अनुषंगाने विचारपुस करता त्याने त्याचे साथीदार २) संदिप गणेश वाघमारे वय ३२ वर्षे, रा.सावखेड भोई ता. देऊळगावराजा, ३) आनंद उत्तम मोरे यय ३२ वर्षे, रा. आखणी, ता. मंठा, ४) प्रकाश राजु झिने वय २२ वर्षे, रा. ◀◀ पान २ वर

## बाजारभाव

कृषि उत्पन्न बाजार समिती, बीड, दि.२० मार्च २०२५

आवक क्विंटलमध्ये तर भाव प्रतिक्विंटलचे आहेत

| | किमान | कमाल | सरासरी |
|---|---|---|---|
| गहू: ३०९.०० क्विंटल | २,४९० | ३,१४५ | २,७५३ |
| ज्वारी/हायब्रिड:२७८.००क्विंटल | १,७०० | ३,८५० | २,४६० |
| मका/लोकल:३६.०० क्विंटल | २,२११ | २,२११ | २,२११ |
| तूर : २९.०० क्विंटल | ६,८२१ | ७,००० | ६,९४० |
| उडीद : ६.०० क्विंटल | ५,४०० | ५,४०० | ५,४०० |
| बाजरी: २१.५० क्विंटल | २,४०० | २,९८० | २,७३५ |
| मुग :४.५० क्विंटल | ६,५०१ | ७,४५१ | ६,९७६ |
| सोयाबीन: ११८.०० क्विंटल | ३,९०० | ३,९५१ | ३,९२५ |
| हरभरा: ३४.०० क्विंटल | ५,००० | ५,६९० | ५,२२१ |

# विखे-पाटील यांच्या कारखान्यात ९ कोटीची बोगस कर्जमाफी

## संचालकांविरोधात गुन्हा दाखल करण्याचे सर्वोच्च न्यायालयाचे आदेश





नवी दिल्ली । वृतसंस्था

**जलसंपदामंत्री राधाकृष्ण विखे -पाटील यांच्या अखत्यारित असलेल्या पद्मश्री विखे -पाटील पाटील यांच्या सहकारी साखर कारखाना घोटाळ्यावरून मंत्री विखे पाटील यांच्या अडचणीत वाढ झाली आहे. कारखान्यात झालेल्या ९ कोटी बोगस कर्जमाफी प्रकरणी संचालकांविरोधात गुन्हा दाखल करून तपास करण्याचे आदेश सर्वोच्च न्यायायलयाने दिले आहेत. याबाबत पत्रकार परिषद घेत बाळासाहेब विखे, दादासाहेब पवार, अरूण कडून एकनाथ घोगरे यांनी गुरूवार (दि.२०) माहिती दिली.**

कारखान्यातील तत्कालीन संचालकांवर कलम १५६(३) अन्वये ९ कोटी रुपयांच्या बोगस कर्ज प्रकरणासंदर्भात गुन्हा दाखल करण्याचे आदेश सर्वोच्च न्यायालयाने दिले आहेत. अशी माहिती केरुनाथ विखे -पाटील यांनी दिली.

यावेळी केरुनाथ पाटील म्हणाले की, ''सर्वोच्च न्यायालयाने राहाता येथील प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी यांच्या आदेशानुसार कार्यवाही करण्याचे आदेश दिले. तसेच ८ आठवड्यात तपास पूर्ण करण्याचे निर्देशही दिले आहेत. विखे कारखान्याने सन २००४–०५ मध्ये युनियन बँक व बँक ऑफ इंडिया या २ बँकांकडून ९ कोटी रुपयांचे कर्ज ऊस ◀◀ पान २ वर

cmyk

## अग्रलेख

# रा.स्व.संघाची कान टोचणी कामी येईल

औरंगजेबाचा मुद्दा सध्या संयुक्तिक नसून राष्ट्रीय स्वयंसेवक संघ कुठल्याही प्रकारच्या हिंसाचाराचे समर्थन करत नाही, अशा स्पष्ट शब्दांत संघाचे अखिल भारतीय प्रचार प्रमुख सुनील आंबेकर यांनी महाराष्ट्रात सुरू असलेला औरंगजेबाचा मुद्दा आणि नागपूरमध्ये घडलेल्या हिंसाचारावर संघाची भूमिका स्पष्ट केली. तसेच कबर पाडण्याच्या मागणीपासून संघाने स्वत:ला दूर ठेवले. संघाच्या या भूमिकेमुळे विश्व हिंदू परिषद आणि बजरंग दल तोंडघशी पडल्याची चर्चा आहे.


संघाचे अ. भा. प्रचार प्रमुख सुनील आंबेकर यांनी बुधवारी पत्रकारांशी संवाद साधला. या वेळी त्यांनी नागपूरमधील हिंसाचाराचा निषेध केला. तसेच कोणत्याही प्रकारचा हिंसाचार समाजाच्या आरोग्यासाठी हानिकारक असल्याचे म्हटले. औरंगजेबाचा मुद्दा सद्यस्थितीत संयुक्तिक विषय नाही. कोणत्याही प्रकारच्या हिंसाचाराला संघाकडून प्रोत्साहन दिले जाणार नाही असे त्यांनी स्पष्ट केले. विश्व हिंदू परिषद व बजरंग दलाने औरंगजेबाची कबर हटवण्यासाठी सोमवारी महाल परिसरात आंदोलन केले. यावेळी प्रतिकात्मक पुतळ्याचे दहन करण्यात आले. यात दर्ग्यावर अर्पण केली जाणारी चादर जाळल्याचा आरोप करण्यात आल्यानंतर दंगल सुरू झाली. 'विहिंप'च्या या आंदोलनाला संघाचाही पाठिंबा असल्याचा कयास लावला जात होता. परंतु, आंबेकर यांच्या प्रतिक्रियेनंतर आता विहिंप तोंडघशी पडल्याची चर्चा आहे. गत आठवडाभर औरंगजेबाच्या नावाने जो गदारोळ सुरू होता त्याला भाजपच्या काही नेत्यांची, मंत्र्यांची वाचाळ, बेताल वक्तव्ये कारणीभूत ठरली. मुख्यमंत्र्यांनी याबाबत मंत्री नितेश राणे यांना तंबी दिल्याची चर्चा आहे. मुख्यमंत्र्यांना गदारोळासंबंधीची कल्पना असेल तर त्यांनी वेळीच आपल्या पक्षातील संबंधितांचे कान का उपटले नाहीत? उलट मुख्यमंत्र्यांनी नागपुरातील दंगल पूर्वनियोजित होती असे म्हटले आहे. जर दंगल पूर्वनियोजित होती तर त्याची कल्पना नागपूरच्या पोलिसांना कशी काय आली नाही? राज्याच्या कुठल्याही भागात दंगल होणे, त्याला व्यापक स्वरूप लाभणे हे सर्वसामान्यपणे सरकारचे आणि पोलिस प्रशासनाचे अपयश मानले जाते. राज्याचा गुप्तचर विभाग झोपला होता काय असा प्रश्न उपस्थित होतोच.

गत काही दिवसांत या विषयावरील दोन्ही बाजूंची वक्तव्ये लक्षात घेता कोणत्याही बाजूकडून औरंगजेबाचे समर्थन झालेले नाही हे स्पष्ट दिसते. तरीसुद्धा औरंगजेबाचे समर्थन करणाऱ्यांना सोडणार नाही अशा प्रकारची भाषा वापरून वातावरण तापत ठेवण्याची काय गरज होती? राज्यापुढे अनेक महत्त्वाचे प्रश्न आहेत. शेतकऱ्यांच्या वाढत्या आत्महत्या, विविध मागण्यांसाठी मोर्चे आणि आंदोलने सुरू आहेत. त्यावरून लोकांचे लक्ष अन्यत्र वळवण्यासाठी खोडसाळपणे औरंगजेबाच्या कबरीचा वाद उकरून काढण्यात आला काय असा प्रश्न उपस्थित होतो. मुळात कबरीचा विषय अचानकपणे पुढे येण्याचे काहीच कारण नव्हते. त्यातच विहिंपने राज्याच्या विविध भागात शिवजयंतीच्या दिवशी औरंगजेबाची कबर हटवण्यासंबंधी आंदोलने केली आणि त्यातून वातावरण चिघळले. अयोध्येप्रमाणे तेथेही कारसेवा करण्याची जाहीर धमकी दिली गेली. हे सारे मुद्दाम वातावरण पेटवण्याचे काम सुरू असताना राज्याच्या गृह खात्याला झोप लागली होती काय? 'छावा' चित्रपट प्रदर्शित झाल्यानंतर औरंगजेबाविषयीचा रोष उसळून आला असे विधान मुख्यमंत्र्यांनी केल्याचे सांगितले जाते. चित्रपटामुळे रोष तीव्र झाला की राज्यात मुद्दाम सगळीकडे पेटवला गेला, त्यात तेल टाकण्याचे काम कोणी केले याबाबत सरकारने आत्मचिंतन करायला हवे. दंगलीचा भडका उडाला, त्याला हवा देण्याचे काम आपल्याच सरकारमधील काही वाचाळ नेते जबाबदार आहेत. ते शांत राहिले असते तर हा वाद इतका विकोपाला गेला नसता हे मुख्यमंत्र्यांनी लक्षात घ्यायला हवे. वातावरण बिघडल्यानंतर, दंगली पेटल्यानंतर लोकांना संयम राखण्याचे आवाहन करून उपयोग नसतो. संभाव्य शक्यता आधीच लक्षात घेऊन आपल्या बाजूने कमालीचा संयम बाळगणे आवश्यक असते. रा. स्व. संघाने महायुती सरकारचे कान टोचले ते बरे झाले.

# रौप्यमहोत्सवी स्वररत्न...

## सांस्कृतिक क्षेत्रातील प्रबोधनकार महागायक-सुभाष शेप

कालौघात उपस्थितांच्या मनोरंजनासाठी विविध सोहळ्यात सांगितिक मैफल अत्यावश्यक झाली आहे. याच मालिकेत रौप्यमहोत्सवी ''स्वररत्न''चा निर्माता आणि आपल्या अभिजात व सुरेल गायकीने उभ्या महाराष्ट्रातील रसिकश्रोत्यांना मंत्रमुग्ध व चिंब करणारा महागायक सुभाष शेप अनेकानेक कारणास्तव आघाडीवीर आणि वैशिष्ट्यपुर्ण ठरतो. रौप्यमहोत्सवी ''स्वररत्न'' या सांगितिक कार्यक्रमाच्या माध्यमातुन सुभाष नाती, माती व माणसं जोडण्याची किमया साधतो, म्हणुन तो संगित क्षेत्रातला ''किमयागार'' कलावंत ठरत आहे. लग्न, मेळावे, सभा, साखरपुडा, वाढदिवस, सण-उत्सव, प्रासंगिक कार्यक्रमात अंतर्मनाचा व काळजाचा ठाव घेणारी सुभाषची गीते ऐकुन श्रोत्यांचे कान तृप्त होताना आपण पाहिले आहे. अर्थात संगित मैफिलीतुन सुभाष मनोरंजन करत नाही तर ''दिवस बदलण्याची ताकत व क्षमता आपल्यात आहे,'' असे सुविचार पेरतो म्हणुन तो सांस्कृतिक क्षेत्रातला प्रबोधनकारसुध्दा ठरतो. कोणत्याही सोहळ्यात संगित व सुत्रसंचलन असे दोन भाग असतात, सुभाष दोन्ही भुमिका लिलया पेलणारा ''कॉम्बोपॅक'' आहे. अर्थात केवळ सोहळ्यात गायकी व निवेदन करत असल्याने सुभाष कॉम्बोपॅक ठरत नाही तर त्याने समाजकारण, राजकारण, शैक्षणिक क्षेत्रासह सांस्कृतिक उपक्रमांची मनोभावे सेवा केली असल्याने सुभाष चतुरस्त्र किंवा अष्टपैलु व्यक्तिमत्व ठरतो. गाणी सादर करताना क्रमबध्द, संदर्भप्रचुर व सुश्राव्य निवेदनातुन विचारांसह संस्कृतीचे संवर्धन करणारा सुभाष खऱ्या अर्थाने संस्कृतीचा दुत किंवा सारथी ठरत आहे. सुभाषच्या संपर्कासह ओळखीचे नेटवर्क कमालीचे समृध्द असल्याने मैफिलित उपस्थित उपस्थितांचा गुणवैशिष्ट्यासह उल्लेख करतो तेंव्हा ''तो मान्यवर'' स्वत:ला कृतार्थ समजतो. प्रत्येक मैफलीत उपस्थित रसिकश्रोत्यांना सुभाष नावांसह ओळखत असल्याने सुभाषची स्मरणशक्ती पाहुन प्रेक्षक थक्क होतात. प्रेक्षकश्रोत्याच्या आवडीची नाडी ओळखणारा सुभाष भावगीते, युगलगीते, देशभक्तीपर गीतांसोबत ''आईवडील, शेतकरी व निसर्गगीते'' सादर करतो तेंव्हा कार्यक्रमाची रंगत सर्वोच्च शिखरावर जात असल्याचा अनुभव येतो. सुभाषच्या भावुक आवाजातील हरकत, आलाप, सुर व नजाकत भाव खावुन तर जातेच, सोबतच गीतांच्या बोलाप्रमाणे हातवारे, हावभाव व देहबोली संगित मैफिलीची उंची वाढवते. रसिकप्रेक्षकांकडुन



मिळणारी टाळ्यांची दाद हीच सुभाषची प्रॉपर्टी असल्याचे दिसुन येते. सुभाषची करुण, हळुवार व भावस्पर्शी आवाजातील कांही गाणी ऐकताना तो मुकवेदनेचा आवाज प्रस्तुत करतोय, असे वाटते. जन्मदिवस, पुरस्कार, लग्नसोहळे किंवा कर्तबगारीबद्दल स्वकीयांना परिचयासह शुभेच्छा, संगित मैफिलीचे फोटो-रेकॉर्डींग आणि वॉलवर मराठी-हिंदी सुवचनांचे लेखन यावरुन सुभाष सोशल मिडीयात कमालीचा सक्रीय असल्याचे दिसुन येते. सर्वदुर नातलगांचा गोतावळा असणारा सुभाष धर्मापुरीचा भाच्चा आहे, हे सविशेष. कार्यक्रम आठवत नाही, मात्र राष्ट्रीय नेते श्रध्देय गोपीनाथराव मुंडे साहेबांची ''उतणार नाही, मातणार नाही'' ही वाक्य सेम टु सेम आवाजात सुभाषकडुन ऐकली तेंव्हा साक्षात साहेब बोलत असल्याचा भास उपस्थितांना झाला होता. विषम व प्रतिकुल परिस्थितीचा सामना करणाऱ्या सुभाषचा करियर प्रवास संघर्षमय आहे, याचे आपण साक्षीदार आहोत. तब्बल तीन दशकापासुन संगितक्षेत्राची मन:स्वी सेवा करणारा सुभाष अनेक पुरस्कारांचा मानकरी ठरला असुन ''महाराष्ट्राचा महागायक'' शिर्षकाखाली एका वृत्तपत्राने पुरवणी प्रकाशित केल्याचे सर्वज्ञात आहे. वक्तृत्वावर प्रभुत्व असणाऱ्या सुभाषच्या बहुअंगी, बहुरंगी व बहुविध भुमिका नटसम्राटाला लाजवेल अशा असतात, याचा अनुभव सार्वत्रिक आहे. रसिकप्रिय, सुरेल, प्रज्ञावंत, गुणवंत, अभिजात, यशवंत व प्रतिभावंत सुभाष महाराष्ट्रभरातील सोहळे जिंकतोय, याचा सकल संगितप्रेमींना सार्थ अभिमान आहे. विनयशिल, हळवा, सुशिल, उत्साही उर्जावाण, मित्रप्रिय व संवादतज्ञ असणाऱ्या सुभाषच्या सादरीकरणातील सहजता रसिकमनावर भुरळ पाडते, हे सर्वश्रुत आहे. आपल्या मधुर, सुस्वर व श्रवणीय गायकीने रसिकश्रोत्यांना ''जग विसरायला'' लावणाऱ्या कलाश्रयी व वलयांकित सुभाष शेप यांच्या संगितसेवेला सद्भावनेसह शुभेच्छा.

## पान ६ वरून...

### पंजाबमध्ये शेतकरी

डीएसपी नतरलोचन सिंग यांनी सांगितले की, गुरुवारी शेतकऱ्यांनी राष्ट्रीय महामार्ग बंद केला. त्यांना आधी इशारा देण्यात आला होता, पण त्यांनी रस्ता सोडला नाही. सरकारच्या सूचनेनुसार, आम्ही कायदेशीर कारवाई केली आणि त्यांना ताब्यात घेतले.

-----------

### दिशा सालियन

आमदार राहू नये. आपण त्यादिवशी कुठे होतो? आपले मोबाईल लोकेशन काय होते? त्या सगळ्यांची उत्तरे द्यावीत. दिशा सालियन प्रकरणात गेले पाच वर्ष बदनामीचे प्रयत्न होत आहे. हा मर्डर कोणी केला सर्वांना माहिती आहे. दिशा सालियन त्या दिवशी घरी कशी आली, हे समोर आले ना तर प्रकरण समोर येईल. दिशा सालियन प्रकरणात जे नाव समोर आले त्यांना पोलिसांनी ताब्यात घ्यावे. नितेश राणे म्हणाले की, हे समोर येईल की, तपासादरम्यान, कोणत्या प्रकारचे दबाव टाकण्यात आले होते. दिशा सालियानच्या वडिलांनी सामुहिक बलात्कार आणि हत्येचा आरोप करून याचिका दाखल केली आहे, त्यामुळे हे प्रकरण आणखी गंभीरतेकडे गेले आहे.

-------------

### ज्येष्ठ शिल्पकार राम सुतार यांना २०२४

राम सुतार हे ज्येष्ठ शिल्पकार आहेत. त्यांचे वय सध्या १०० वर्ष असून अजूनही ते शिल्प तयार करण्याचे काम करीत आहेत. इंदू मिल येथे निर्माणाधीन असलेल्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या भव्य स्मारकातील डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची मूर्ती तयार करण्याचे कामही राम सुतार करीत आहेत. या पुरस्कार निवडीबाबत १२ मार्च २०२५ रोजी निवड समितीची बैठक घेण्यात आली. या बैठकीत राम सुतार यांचे नाव २०२४ च्या पुरस्कारासाठी मान्यता देण्यात आली. या पुरस्कारचे स्वरूप २५ लाख रुपये, मानपत्र, मानचिन्ह व शाल असे आहे, असेही मुख्यमंत्री फडणवीस यांनी यावेळी सांगितले.

--------------

### नागपूर हिंसाचार:फहीम खानसह

नागपूर हिंसाचार प्रकरणात एनआयए तपास करणार की, नाही याबाबत केंद्र सरकार निर्णय घेईल. तर एटीएसचा निर्णय हा राज्य सरकार घेईल, असे सायबर पोलिसचे डीसीपी लोहित मतानी यांनी सांगितले. नागपूर हिंसाचारासाठी वादग्रस्त मजकुराचे अनेक फेसबुक पेज सापडले आहेत. त्यावर जिहादी आणि अतिरेकीसारखा मजकूर आहे. यापुढे कोणतीही अनुचित घटना घडू नये, तेढ वाढू नये यासाठी सोशल मीडियावरील पोस्ट ब्लॉक करण्याचे काम सुरू आहे. अशा प्रकारचे सोशल मीडियावरील १७ ते १९ तारखेपर्यंतचे सर्व पेजेस ब्लॉक करण्यासाठी आम्ही संबंधित एजन्सीला पाठवले आहेत. आतापर्यंत ५० टक्के पोस्ट ब्लॉक केलेल्या आहेत. इतर पोस्ट लवकर ब्लॉक होतील. हिंसाचार प्रकरणातील आरोपी फहीम खान हा सायबर गुन्ह्यातही आरोपी आहे, अशी माहितीही मतानी यांनी दिली आहे.

-------------

### धान्य चोरी करणारी

लोनगाव व त्याचेआणखी तीन फरार साथीदार यांच्या मदतीने पोलीस ठाणे जाफ्राबाद, मंठा, भोकरदन, बदनापुर, मौजपुरी च्या हधीत वेगवेगळ्या गावात सोयाबीन, हरबरा, गहु, तुरी, ज्वारी चे धान्याचे कट्टे चोरी केल्याचे सांगून ०८ गुन्हे केल्याची कबुली दिली. आरोपी १) बळीराम रावसाहेब फुके २) संदिप गणेश बाधमारे वय ३२ वर्षे, रा. सावखेड भोई ता. देऊळगावराजा, ३) आनंद उत्तम मोरे यय ३२ वर्षे, रा. आखणी, ता. मंठा, ४) प्रकाश राजू झिने बय २२ वर्षे, रा. लोनगाव यांचे कडुन खालील प्रमाणे गुन्हे उघडकीस आले आहे ठाणे जाफ्राबाद व पोलीस ठाणे मौजपुरी यांच्या जप्त करण्यात आला आहे. आरोपीतांना पुढील गुन्ह्याचे तपास कामी ताब्यात देण्यात आले आहे. सदर ची कारवाई पोलीस अधीक्षक अजय कुमार बंसल, अप्पर पोलीस अधीक्षक आयुष नोपाणी यांचे मार्गदर्शनाखाली श्री. पंकज जाधव, पोलीस निरीक्षक स्थागुशा जालना, योगेश उबाळे, सहा.पो.निरी, राजेंद्र वाघ, पोउपनि, पोहया सॅम्युअल कांबळे, प्रशांत लोखंडे, विनय डिक्कर, धिरज भोसले, योगेश सहाने, सोपान क्षीरसागर, सागर बाविस्कर, रमेश राठोड, कैलास खाडे, सतिष श्रीवास, रमेश काळे, इरशाद पटेल, भाऊराव गायके, आफूर धांडगे, कैलास चेके, किशोर पुंगळे, सौरभ मुळे, गणपत पवार सर्व स्थानिक गुन्हे शाखा जालना यांनी केली.

---------------

### विधीमंडळात सभापती, अध्यक्षांकडून

आणि पर्यायी धोरण सुचविणे आहे. महाराष्ट्र विधानपरिषद व विधानसभा सभागृहामध्ये सभापती व अध्यक्ष यांच्याकडून सभागृहाच्या कामकाजात पक्षपाती व एकांगी भूमिकेचा अवलंब केला जात आहे. दोन्ही सभागृहाच्या कार्यवाहीमध्ये संसदीय परंपरांचे पालन न करता नियम बाह्य सभागृहाचे कामकाज चालविले जात असल्याची माहिती राज्यपाल यांना दिली. याप्रसंगी शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे विधिमंडळ गटनेते व आमदार आदित्य ठाकरे, राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार पक्षाचे प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील, काँग्रेसचे विधिमंडळ गटनेते विजय वडेट्टीवार, नाना पटोले, अनिल परब, भास्कर जाधव, भाई जगताप, शशिकांत शिंदे, जितेंद्र आव्हाड, सुनील राऊत, सचिन अहिर, आनंद बाळा नर, प्रवीण स्वामी, अभिजित वंजारी, अजय चौधरी, सुनील शिंदे, अरुण शेठ, ज. मो. अभ्यंकर, मनोज जामसुतकर, सिद्धार्थ खरात, कैलास पाटील व वरुण सरदेसाई आदी उपस्थित होते.

-----------

### सीबीएसई पॅटर्न यंदाच्या वर्षी फक्त पहिलीलाच,

करण्यात येईल. राज्यातील विद्यार्थ्यांची गुणवत्ता वाढीस लागावी या हेतूने सरकारने हा निर्णय घेतला आहे. राज्याचे शिक्षणमंत्री दादा भुसे यांनी यासंदर्भात माहिती दिली. तसेच, सीबीएससी पॅटर्न लागू केल्याने शाळांमध्ये कुठलीही फी वाढ होणार नाही, असेही दादा भुसे यांनी स्पष्ट केले.

---------

### विखे-पाटील यांच्या कारखान्यात

लागवड 'बेसल डोस'साठी घेतले होते. या रकमा शेतकऱ्यांना धनादेशाने किंवा त्यांच्या थेट खात्यावर जमा करण्याचे बंधनही बँकेने घातले होते. या रकमेचे वाटप सभासदांना केले नाही, त्याची माहितीही शेतकरी किंवा सभासदांना दिली नाही. याकाळात राधाकृष्ण विखे राज्याच्या मंत्रीमंडळात मंत्री व कारखान्याचे संचालक होते''. अशी माहिती केरूनाथ पाटील यांनी दिली. २००९ साली महाराष्ट्र सरकारकडून कृषी कर्जमाफी योजना आणली. ही योजना कृषी संबंधातील कोणत्याही संस्था किंवा सोसायट्यांना लागू नव्हती. तरीही विखे कारखान्याने दोन्ही बँकांना शासनाकडे कर्जमाफीचा प्रस्ताव करण्यास भाग पाडले. या प्रस्तावात शेतकऱ्यांना कर्ज वाटप झाल्याचे दाखवण्यात आले. त्याची यादीही बँकांनी प्रस्तावात सादर केली. मात्र राज्य सरकारच्या लेखापरीक्षणात लाभ देण्यात आलेल्या शेतकऱ्यांचे बँक स्टेटमेंट उपलब्ध नसल्याचे विभागीय निबंधकांनी (सहकारी संस्था) यांनी नमूद केले. बँकांनी सादर केलेले प्रस्ताव कर्जमाफी योजनेच्या विरुद्ध आहेत. त्यामुळे ९ कोटीची रक्कम ६ टक्के व्याजासह वसुलीचे आदेश राज्य सरकारने दिले होते''. अशी माहिती केरूनाथ पाटील यांनी दिली.

-------

## पान ६ वरून...

### बीड मतदारसंघातील प्रश्न

कार्यालयाच्या नवीन इमारतींची मागणी सातत्याने होत आहे. त्यासाठी निधी देण्यात यावा. या महत्त्वाच्या बाबींवर प्रकाश टाकून आ.संदीप क्षीरसागर यांनी सभागृहाचे लक्ष वेधले.

--------------

### गावकऱ्यांनी व्यक्त केले आ.प्रकाश

केंडेपिंप्री, पुनंदगांव, परडी माटेगांव सह आदी वाड्या, वस्त्या, तांड्यावरील गावांना, शेतकऱ्यांना, पशुधनांना या मुळे मुबलक पाणी मिळणार आहे.यावेळी माजी सभापती प्रशांत सावंत, नगराध्यक्ष शेषेराव जगताप, सभापती संभाजी शिंदे,डॉ.दत्तात्रय दुधाणे, माजी जिल्हा परिषद सदस्य औदुंबर सावंत, नगरसेवक सचिन सानप, माजी सरपंच सुभाष सावंत, माजी सरपंच प्रविण सावंत, चेअरमन दत्तात्रय मायराने,वसंत आबा सावंत, युवा नेते अॅड.आनंद काळे, तानाजी आजबे, संचालक सचिन लंगडे, सरपंच माधव शेंडगे, सरपंच सुभाष आजबे,रामराव पवार, ज्ञानोबा राठोड, रामराव चव्हाण,बबन भिसे, सरपंच प्रल्हाद सोनवणे, दिनेश सावंत, वसंत वडचकर, नारायण बडे, अॅड.प्रदिप शेळके,शेख ताहेर, सचिन हलकर, विजय मोरे, राजाभाऊ काळे,बबन आडे सह आदींची उपस्थिती होती.

------------

### चौसाळा येथील अतिक्रमण

धारकांनी आपले अतिक्रमण तातडीने एक दिवसात हलवावे अन्यथा सदर बांधकाम हे ग्रामपंचायत चौसाळा महसूल विभाग सार्वजनिक बांधकाम विभाग यांच्या संयुक्त नुसार हटविण्यात येईल त्यांच्या बांधकाम नुकसानभरपाई सर्वस्वी जबाबदारी अतिक्रमण धारकावर राहील करिता सर्व नागरिकांनी आपले अतिक्रमण एक दिवसात हटवून सहकार्य करावे असे आवाहन चौसाळ्याचे सरपंच सौ मंगल ताई लोढा उपसरपंच अंकुशराव कळासे ग्रामविकास अधिकारी बाबासाहेब चव्हाण मंडलअधिकारी जायभाये साहेब तलाठी के आर निर्मळ व सामाजिक कार्यकर्ते मोहन झोडगे यांनी केले आहे.

----------

### बीड जिल्हा मराठी पत्रकार परिषदेच्या

धनंजय आरबुने यांची तर उपाध्यक्षपदी पाटोदा येथील सचिन पवार यांची नियुक्ती करण्यात आली आहे. उर्वरित कार्यकारिणी लवकरच जाहीर केली जाईल अशी घोषणा मिलिंद अष्टीवकर यांनी केली आहे. नव्या पदाधिकाऱ्यांचे एस.एम.देशमुख, विश्वस्त किरण नाईक, शरद पाबळे, डिजिटल मिडिया परिषदेचे अध्यक्ष अनिल वाघमारे, परिषदेचे विभागीय सचिव रवी उबाळे, विभागीय समन्वयक सुभाष चौरे ,परिषद प्रतिनिधी विलास डोळसे यांनी अभिनंदन करून त्यांना शुभेच्छा दिल्या आहेत.

-------------

### वडवणीचे कैलास पाटसकर

व्यक्ती होते. नामदेव समाजोन्नती परिषद महाराष्ट्र राज्य या संघटनेचे ते राज्य कार्यकारिणी सदस्य म्हणून कार्यरत होते. शिंपी समाजातील प्रत्येक कार्यात त्यांचा सहभाग हा उल्लेखनीय असाच राहिला आहे. त्यांनी मोठ्या कष्टातून व हिंमतीने अथक परिश्रमातून शून्यातून विश्व निर्मिती केलेली आहे. आपल्या कुटुंबाला एक संघपणे बांधून ठेवत कुटुंबातील प्रत्येकाची जीवापाड काळजी घेणारे अण्णा असे अचानक गेल्याने सर्वांच्याच मनाला एकप्रकारे चटका बसला आहे. त्यांना हृदयाच्या जागी त्रास होवू लागल्याने मागील आठवड्यातच त्यांच्यावर बीड येथील एका खाजगी रुग्णालयामध्ये अँजिओप्लास्टी नावाची हृदयाची शस्त्रक्रिया करण्यात आली होती. मात्र चार दिवसांपूर्वी त्यांना परत हृदयाच्या जागी त्रास जाणवू लागल्याने परत एकदा उपचारार्थ त्या रुग्णालयामध्ये भरती करण्यात आले होते. त्यातून बरे वाटू लागल्याने त्यांना बुधवार दिनांक १९ मार्च २०२५ रोजी सायंकाळी रुग्णालयातून सुट्टी देण्यात आली होती. परंतू काळाने परत एकदा त्यांच्यावर घाला घालत रुग्णालयातून परतत असतानाच शहरामध्येच त्यांना हृदयविकाराचा तीव्र झटका आला. लागलीच त्यांना परत रुग्णालयात घेवून जाण्यात आले. त्यांची मृत्यूशी झुंज सुरुच होती. परंतू मध्यरात्री १२:३० वाजण्याच्या सुमारास त्यांची प्राणज्योत मालवली. त्यांच्या पार्थिवावर गुरुवारी दुपारी १२ वाजता वडवणी येथील अमरधाम या ठिकाणी अंत्यसंस्कार करण्यात आले. याप्रसंगी त्यांना अखेरचा निरोप देण्यासाठी आप्तेष्ट, नातेवाईक, मित्रपरिवार, व्यापारी, पत्रकार, वकील बांधव यांसह अनेक जण उपस्थित होते. सर्वांनी दिवंगत कैलास अण्णा यांना साश्रू नयनांनी अखेरचा निरोप दिला. त्यांच्या पश्चात कुटुंबामध्ये चार भाऊ, पत्नी, मुले, मुली, नातवंड असा मोठा परिवार असून पाटसकर कुटुंबीयांवर कोसळलेल्या दुःखात दैनिक राज्य लोकतंत्र परिवार सहभागी आहे.

--------

### पालिकेच्या २ लाख कर्मचाऱ्यांचे

सध्या मार्च महिना असल्यामुळे सर्वच नगरपरिषदांचे अधिकारी-कर्मचारी घरपट्टी व पाणीपट्टी वसुलीसाठी उन्हातान्हात फिरत आहेत. वसुली वाढवण्यासाठी सर्वच अधिकारी-कर्मचाऱ्यांच्या सार्वजनिक सुट्ट्याही रद्द करण्यात आलेल्या आहेत. नगरपालिकेच्या महसुलात वाढ होण्यासाठी कडकडीत उन्हात राब-राब राबणाऱ्या नगरपालिका कर्मचाऱ्यांवर शासन व मा. उपमुख्यमंत्री तथा नगरविकास मंत्री श्री. एकनाथ शिंदे किमान माणुसकी म्हणून तरी मेहेरबान होऊन सहायक अनुदान वेळेवर किंवा १ महिना आधीच देणार काय? असा सवाल सर्वच नगरपालिका अधिकारी-कर्मचारी करत आहेत.

--------------

### स्वयंसहायता बचत गटांच्या

संस्कृती खाद्य जत्रा व स्टॉलला भेट दिली. सदर विक्री व प्रदर्शनाची दररोज वेळ सकाळी १०.०० ते रात्री ११.०० वाजेपर्यंत आहे. बचतगट स्वयंसहायता समुहातील महिलांच्या प्रगतीचा, महा खरेदीचा उत्सव, महा मेजवानीचा, गुढीपाडवा महोत्सव, ईद बाजार व खाद्य जत्रा जिल्हास्तरीय विक्री व प्रदर्शन २०२५ मध्ये खास आकर्षण मसाले, खाद्यपदार्थ, हस्तकला, ग्रामीण कलाकुसर, ज्वेलरी तसेच शाकाहारी व मांसाहारी मेजवानी व खुप काही आयोजित करण्यात आलेले आहे. उमेद च्या जिल्हास्तरीय विक्री व प्रदर्शनाचा लाभ घ्यावा व एकवेळ अवश्य भेट द्यावी, असे आवाहन जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेच्या प्रकल्प संचालक संगीतादेवी पाटील यांनी केले आहे.

----------

### महावितरणने चालवलेला

कार्यालयासमोर तीव्र आंदोलन करण्यात येईल,'' असा इशाराही अँड. मनोज संकाये यांनी दिला आहे.

**नागरिकांची मागणी वीजपुरवठा सुरळीत करावा**

परळीतील नागरिकांनी महावितरणच्या या अनागोंदी कारभाराचा निषेध नोंदवत, विजेचे वेळापत्रक निश्चित करण्याची मागणी केली आहे. अन्यथा, आगामी काळात याविरोधात मोठे आंदोलन छेडले जाईल, असा इशारा देण्यात आला आहे.

------------

### उद्योजक लक्ष्मण मोरे यांना नगरभूषण,

परळीत हाती पडेल ते काम करून आम्हा भावंडांना शिकवले व सामर्थ्यशाली बनवले. परळीत माध्यमिक पर्यंत शिक्षण घेऊन लातूर येथे बारावीपर्यंतचे तर पदवीचे शिक्षण पुणे येथे घेऊन नामांकित अशा कंपनीमध्ये चांगल्या पॅकेजवर नोकरी मिळाली पण स्वतःच काहीतरी असलं पाहिजे ही सारखी इच्छाशक्ती बळावत होती. तेथून जर्मनी गाठले आणि त्या ठिकाणी व इतर काही देशात जाऊन अॅल्युमिनियम स्पेअर पार्ट बनवण्याचे प्रशिक्षण घेतले व जर्मनीत उद्योग सुरू केला. २०१६ साली 'मेक इन इंडिया' अंतर्गत पंतप्रधान नरेंद्रजी मोदी यांच्या कार्याला प्रेरित होऊन भारतात येऊन भारतातील व विशेषतः महाराष्ट्रातील बेरोजगारांच्या हाताला काम देण्याचा निर्णय घेतला.त्या निर्णयाला मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी समर्थ साथ दिली व महाराष्ट्रात चाकण (पुणे )येथे कंपनी सुरू केली.महाराष्ट्र व मराठवाडा भागातील तरुणांमध्ये तरुणांमध्ये मोठी जिज्ञासा आहे, काम करण्याची तयारी आहे, संघर्ष करून भिडण्याची इच्छाशक्ती आहे. परंतु त्या ठिकाणी तरुणांना जे मार्गदर्शक किंवा सहकार्य करण्यासाठीची जी व्यवस्था लागते त्यासाठी सहकार्य मिळत नाही. म्हणून अनेक जण हाताश होतात. मलाही त्या संकटाचा सामना करावा लागला, पण हार मानली नाही. प्रत्येक आव्हानाला तोंड देत वाटचाल सुरू राहिली .तरुणांनी नाउमेद न होता मोठ्या आत्मविश्वासाने तयारी करावी आणि उद्याच्या आव्हानाला तोंड देण्याची तयारी ठेवली तर यश तुमच्या पदरात आहे.मराठवाड्यात मोठे मागासले पण आहे त्याला कारणीभूत ही इथली व्यवस्था आहे. शासनाने उद्योजकांना मूलभूत सुविधा उपलब्ध करून दिल्या तर उद्योजक ग्रामीण भागाकडे यायला वेळ लागणार नाही.उद्योजकांना चांगले रस्ते,दळणवळणाची प्रभावी साधने, अपेक्षित जागा, भरपूर वीज व इतर प्रकारचे सहकार्य अपेक्षित असते.परंतु या गोष्टी मिळत नाहीत म्हणून उद्योजक इकडे यायला धजावत नाहीत. विद्यार्थ्यांनी न्यूनगंड बाजूला ठेवून परिस्थितीशी दोन हात करून पुढे येण्याची तयारी दर्शवली तर जग आपल्या मुठीत असल्याचे इंजि.भरत गीते यांनी सांगितले. यावेळी प्राचार्य डॉ.बी.आय, खडकभावी बोलताना म्हणाले की, वार्ता समूहाने सातत्याने चांगुलपणाचा गौरव आणि कौतुक केले आहे. समाजात जी मंडळी चांगले काम करते आहे. त्यांच्या पाठीवर शाबासकीची थाप मारण्याचा प्रयत्न असतो. अध्यक्षीय समारोप करताना अंबाजोगाई पीपल्स बँकेचे चेअरमन राजकिशोर मोदी म्हणाले की, दैनिक वार्ता समूहाने अंबाजोगाई व परिसरातील ज्या मंडळींनी समाजात असेल, व्यवसायात असेल किंवा उद्योग जगतात असेल अशा गुणीजनांचा सन्मान करून त्यांची पावले अंबाजोगाईकडे वळवण्याचे काम केले आहे .गेल्या १७ वर्षापासून हा कौतुकाचा व सन्मानाचा यज्ञ अखंडितपणे सुरू आहे. समाजात आज एखाद्याला चांगले म्हणण्याचे औदार्य सुद्धा दिसून येत नाही पण वार्ता समूहाने या गावच्या व्यक्तींचा सन्मान करून त्यांचे मनोबल वाढवण्याचे काम केले आहे. सामाजिक जाणीवा जिवंत ठेवून सामाजिक बांधिलकी जपण्याचा वार्ता समूहाचा प्रयत्न आहे असे उपक्रम म्हणजे अंबाजोगाईचा गौरव असल्याचे मोदी यांनी सांगितले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक वार्ता समूहाचे संपादक परमेश्वर गित्ते यांनी करताना सांगितले की, अंबाजोगाईच्या या पवित्र भूमीने अनेक चांगले व कर्तबगार व्यक्तिमत्व दिले आहेत ज्यांच्या कार्याचा डंका राज्यभर,देशभर व जगात गाजलेला आहे. कर्तुत्वानाचा गौरव आणि सन्मान केल्याने त्यांनाही काम करण्याची प्रेरणा मिळते व त्यांच्यातील कामाचे मनोबल वाढते अंबाजोगाई ही रत्नांची खाण असून याच अंबाजोगाईने वेगवेगळ्या क्षेत्रात राज्याचे व देशाचे नेतृत्व केले आहे. म्हणून वार्ता समूह हा सातत्याने चांगले काम करणाऱ्याच्या पाठीशी खंबीरपणे उभा राहतो. मायभूमीतील माणसाचा मायभूमीकडून सन्मान करण्याचा प्रयत्न असतो असे संपादक परमेश्वर गित्ते यांनी सांगितले. प्रारंभी स्व. द्रोपदीबाई गित्ते यांच्या प्रतिमेचे पूजन करून दीप प्रज्वलन करण्यात आले. महागायक सुभाष शेप व मयुरी मजगे यांनी जय.. जय.. महाराष्ट्र माझा हे राज्य गौरव गीत सादर करून उपस्थितांची मने जिंकली .कार्यक्रमाचे संचलन ह. भ. प.गोविंद महाराज केंद्रे यांनी तर आभार प्रदर्शन जगन बापू सरवदे यांनी केले.कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी अंबाजोगाई तालुका पत्रकार संघ, अ.भा.म.प.शाखा अंबाजोगाई, तालुका पत्रकार संघ अंबाजोगाई,महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघ शाखा अंबाजोगाई, व्हॉईस ऑफ मीडिया,शाखा अंबाजोगाई, गुड मॉर्निंग ग्रुप अंबाजोगाई व इतर आणि परिश्रम घेतले.

जा.क्र./न.प./अंबड/नामांतर/२०२५/१३८
कार्यालय नगर परिषद, अंबड
दिनांक :- १३/०३/२०२५

नाव बदलण्याचा

**जाहिरनामा**

अर्जदार श्री/सौ/श्रीमती : १) दत्तात्रय गंगाधर नवले, सर्व्हे नं.-१२, प्लॉट नं.-१, सि.स.नं. -१८३७/क/१ न.प. घर नं.१८-१४१-१/१ चे वारसा अधारे हस्तांतरण करणे बाबत.

सर्व जनतेस या जाहिरनाम्याद्वारे कळविण्यात येते की, सदरील अर्जदार नकाशात वरील न.प.मालमत्ता घर क्र. () दर्शविलेल्या प्रमाणे मोहल्ला येथे इमारतीचे/जागेचे नांव बदलून घेऊ इच्छीतों ज्याची चतुःसिमा खालील प्रमाणे आहे. जर कोणास या बददल आक्षेप असेल तर त्यांनी हा जाहिरनामा प्रसिध्द झाल्यापासुन (१५) पंधरा दिवसाचे आत कार्यालय नगर परिषद, अंबड येथे लेखी आक्षेप सादर करावा. नसता कोणती ही तक्रार ग्राह्य धरली जाणार नाही.

चतुः सिमा
पुर्व- प्लॉट नं.२
पश्चिम :याच प्लॉट मधील भाग
दक्षिण- ६ मीटर कॉलनी अंतर्गत रोड
उत्तर : सर्वे नं.१२ मधील जमिन

स्वाक्षरित
**मुख्याधिकारी**
नगर परिषद, अंबड

दैनिक राज्य लोकतंत्र
नवी दिशा... नवे विचार.....
३
शुक्रवार दि.२१ मार्च २०२५

## चार चिमुकल्यांचा पहिला रोजा पुर्ण



म्हसोबावाडी : मुस्लिम धर्माच्या पवित्र रमजान महिन्याला अनन्यसाधारण महत्त्व आहे. या महिन्यात मुस्लिम समाजातील लहान चिमुकल्यांना वगळून इतर सर्वांना रोजा (फर्ज) सक्तीचे असतात. परंतु घरात पालकांचे पाहून हे लहान चिमुकले ही मोठ्यांचे अनुकरण करीत रोजा धरतात. आष्टी येथील अरफा सद्दाम शेख, वय ८ वर्ष, अर्शद सद्दाम शेख,वय ६ वर्षे, अरमान रौफ तांबोळी, वय ९ वर्षे, आयेशा रौफ तांबोळी,७ वर्ष या लहान भाव - बहिणींनी आयुष्यातील पहिला रोजा कडक उन्हाळा सुरू असतानाही पुर्ण केला आहे. यावर्षीचा पवित्र रमजान महिना शनिवार दि. १ मार्च २०२५ रोजीच्या सायंकाळ पासून आरंभ झाला आहे. दिवससभर अन्नाचा कण व पाण्याचा एक थेंबही न घेता काटेकोर नियम पाळत आपल्या आयुष्यातील पहिला रोजा यशस्वी पुर्ण केल्याबद्दल नातेवाईक व इतरांनी त्यांचे कौतुक करत पुष्पगुच्छ देत अभिनंदन केले.

# अंबाजोगाईत अन्नत्याग आंदोलनानिमित्त विविध उपक्रम

## पाचशे विधवा महिलांचा साडीचोळी देवून बाजार समितीने केला सन्मान

अंबाजोगाई । प्रतिनिधी

अन्नत्याग आंदोलनाच्या निमित्ताने अंबाजोगाईत बुधवारी सामुहिक उपवास करत पाचशे आत्महत्याग्रस्त शेतकर्यांच्या विधवा पत्नींचा कृषी उत्पन्न बाजार समितीच्या वतीने साडीचोळी देवून सन्मान करण्यात आला. तर यावेळी आधार माणूसकीचा या संस्थेचे अध्यक्ष अॅड.संतोष पवार यांना शेतकरी सहवेदना पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. याच कार्यक्रमात पत्रकार तथा सामाजिक कार्यकर्ते गोविंद शेळके यांनी शेतकरी आत्महत्या कारण आणि मिमानसा या विषयावर व्याख्यान दिले. अशा विविध उपक्रमांनी अन्नत्याग आंदोलन समितीने हा उपक्रम अनोख्या पद्धतीने साजरा केला.

१९ मार्च हा दिवस शेतकरी सहवेदना दिन म्हणून साजरा केला जातो. या दिनाचे औचित्य साधुन किसानपुत्र आंदोलन शेतकरी संघटना व आधार माणसूकीचा यांच्या वतीने विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी प्रमुख अतिथी म्हणून बाजार समितीचे सभापती अॅड.राजेश्वर चव्हाण, ज्येष्ठ पत्रकार तथा सामाजिक कार्यकर्ते गोविंद शेळके, अन्नत्याग आंदोलन समितीचे प्रमुख तथा या आंदोलनाचे संयोजक सुदर्शन रापतवार, शेतकरी संघटनेचे कालिदास आपेट, आधार माणूसकीचा या संस्थेचे अध्यक्ष अॅड.संतोष पवार, आशा अमर हबीब, आत्महत्याग्रस्त शेतकर्यांच्या विधवा पत्नींच्या प्रतिनिधी ज्ञानेश्वर मुंडे यांची उपस्थिती होती. अन्नत्याग आंदोलनाच्या निमित्ताने सामुहिक उपवास सोडण्याचा कार्यक्रम यावेळी झाला. येथील प्रगतशील शेतकरी अनिरूद्ध चौसाळकर यांनी या उपक्रमासाठी पुढाकार घेतला. हे सर्व उपक्रम यशस्वी करण्यासाठी माजी सरपंच वसंत मोरे, प्रा.शांतीनाथ बनसोडे, मुजीब काझी, अनिरूद्ध चौसाळकर, सुभाष बाहेती, अच्युत गंगणे, प्रा.पंडीत कराड, मदन परदेशी यांच्यासह अन्नत्याग आंदोलन सतितीचे कार्यकर्ते व पदाधिकारी यांनी परिश्रम घेतले.



### या व्यवस्थेला जबाबदार कोण?- गोविंद शेळके

शेतकर्यांच्या आत्महत्या दिवसेंदिवस वाढतच आहेत., शेतमालाला न मिळणारे हमीभाव, शेतकर्यांप्रती सर्वांचेच होणारे दुर्लक्ष यामुळे अस्थिर जगणं असय्य होत असल्याने शेतकरी आत्महत्येचा मार्ग पत्करतात मात्र हे शेतकर्याचं अस्तिर जीवन कोण करतं? या प्रश्नाची उकल झाली पाहिजे. आणखी किती शेतकर्यांचे बलीदान हवे आहे? या बाबतीत परिवर्तन होणार की नाही? या व्यवस्थेला जबाबदार कोण? अशा अनेक प्रश्नांवर गोविंद शेळके यांनी आपले विचार व्यक्त केले.

### पाचशे विधवा महिलांचा साडीचोळी देवून केला सन्मान

शेतकरी सहवेदना दिननिमित्त येथील कृषी उत्पन्न बाजार समिती यांच्या वतीने आत्महत्याग्रस्त शेतकर्यांच्या पाचशे विधवा पत्नींचा सन्मान कृषी उत्पन्न बाजार समितीच्या वतीने करण्यात आला. बाजार समितीचे सभापती अॅड.राजेश्वर चव्हाण यांनी या कामी पुढाकार घेतला. समाजात शेतकरी हाच वर्ग उपेक्षित राहिला असल्याचे त्यांनी सांगितले. ही व्यवस्था परिवतीत करण्यासाठी सामुहिक प्रयत्नांची गरज असल्याचे अॅड.चव्हाण यांनी सांगितले. यावेळी परळी येथील माजी जिल्हा परिषद सदस्य अजय मुंडे, माजी आ.संजय दौंड, माजी नगराध्यक्ष राजकिशोर मोदी, बाजीराव धर्माधिकारी, गोविंद देशमुख व मान्यवरांच्या हस्ते यावेळी महिलांना साडीचोळी देवून सन्मानित करण्यात आले.

### अॅड.संतोष पवार शेतकरी सहवेदना पुरस्काराने सन्मानित

आधार माणसूकीचा संस्थेचे अध्यक्ष संतोष पवार यांना किसानपुत्र आंदोलन व अन्नत्याग समितीच्या वतीने दिला जाणारा शेतकरी सहवेदना पुरस्कार उपस्थित मान्यवरांच्या हस्ते शाल, श्रीफळ, स्मृती चिन्ह व सन्मानपत्र देवून प्रदान करण्यात आला. या सन्मानपत्राचे वाचन अभिजीत जोंधळे यांनी केले. यावेळी आपल्या सत्काराला उत्तर देताना संतोष पवार म्हणाले की, समाजातील उपेक्षितांच्या मदतीसाठी काम करता आले पाहिजे. समाजात आजही अनेक जण उपेक्षित, वंचित आहेत. त्यांना मदतीची मोठी गरज आहे. अशा सर्व उपेक्षितांना मदतीचा हात देण्यासाठी सर्वांनी पुढे यावे असे आवाहन त्यांनी केले.

## कडक उन्हाळ्यात माठ विक्रेते अडचणीत

### दिवसभरात माठ विक्रीस अल्प प्रतिसाद



अंबाजोगाई । प्रतिनिधी

सध्या कडक उन्हाळा जाणवत आहे. मात्र या वर्षी नागरिकांनी कडक उन्हाळ्यात गरीबाचा फ्रिज म्हणून ओळख असलेल्या माठाकडे पाठ फिरवल्याचे दिसते. दिवसभरात माठ विक्रीस नागरिकांचा अल्प प्रतिसाद असून माठ विक्रेते अडचणीत सापडले आहेत. उन्हाळा लागताच दिवसभर पाणी पिऊन देखील तहान जात नाही. तापमान वरचेवर उंचावत आहे अंगाची लाही लाही तर होतेच, त्याचबरोबर घशाला वारंवार कोरड पडते. ही घशाची कोरड थंड पाण्याने थांबविण्यासाठी घरात अथवा कामाच्या ठिकाणी नागरिक बहुधा माठातील पाण्याला पसंती देतात. माठातील पाणी नैसर्गिक पद्धतीने थंड होते. त्यामुळे फ्रिजच्या पाणी सेवनाने जश्या शारीरिक समस्या उद्धवतात शकतात, तशा या पाण्याने होत नाही. त्याशिवाय हे पाणी पिल्याने तहानही लवकर जाते. त्यामुळे अनेकदा जुनी मंडळी फ्रिज ऐवजी माठातील पाणी पिण्याचा सल्ला देतात. माठ विक्रीतून तीन ते चार महिन्यात लाखोंची उलाढाल होते.

यंदाही या माठ विक्रेत्यांना चांगली कमाई होण्याची आशा आहे. पणशहरातील नागरिकांची माठाची मागणी अत्यल्प आहे उन्हाळ्याची चाहूल लागली असून उन चांगलच तापत आहे. तरी देखील माठांची पाहीजे त्या प्रमाणात विक्री होत नसल्याने माठ तयार करणा-यांना ग्राहकांच्या प्रतिक्षेत तासन्? तास बसावे लागत आहे.

ओळखून परराज्यातून तसेच बाहेरील जिल्ह्यातून आलेल्या माठ विक्रेत्यांनी, मंडी बाजार, छत्रपती शिवाजी महाराज चौक,परळी रोडलगतचा रस्ता या सह इतर ठिकाणी काळा माठ, लाल माठ, रांजण नक्षीदार माठ मांडून विक्री सुरु केली आहे. मात्र आठवडाभरापासून प्रखर ऊन जाणवत असतांना देखील विक्रेत्यांना हवी तशी कमाई माठ विक्रीतून होत नसल्याचे माठ विक्रेते बबन मारवाळ यांचे म्हणणे आहे. दिवसभरात दहा ते बारा माठ विक्री होत असल्याने लाखोंची उलाढाल होणाऱ्या या व्यवसायात मोठे अर्थिक नुकसान होते कि काय अश्या संभ्रमात माठ विक्रेते आहेत.

## अनुसुचित जातीच्या आरक्षणाचे उपवर्गीकरण करा

### अनिल राधे कांबळे मित्र मंडळाची मुख्यमंत्र्यांकडे मागणी



माजलगाव। प्रतिनिधी

अनुसुचित जातीतील आरक्षणाचे अ, ब, क, ड असे उपवर्गीकरण करा, क्रांतीविर लहुजी साळवे मातंग अभ्यास आयोगाच्या शासनाने स्विकारलेल्या शिफारशींची तात्काळ अंमलबजावणी करा अशी मागणी तहसिलदारांमार्फत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे आज दि. २० मार्च रोजी निवेदनाव्दारे करण्यात आली आहे.

दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, १ ऑगस्ट २०२४ च्या सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयानुसार अनुसूचित जातीतील आरक्षणाचे उपवर्गीकरण करण्याचे अधिकार राज्य शासनाला असल्याचा सर्वोच्च निकाल दिलेला आहे. त्यानुसार शासनाने सेवानिवृत्त न्यायमुर्ती अनंत बदर यांच्या अध्यक्षतेखाली एक सदस्यीय समिती दि. १५ ऑक्टोबर २०२४ रोजी गठीत केली आहे. बदर समितीने दोन महिण्यात अहवाल सादर करावा, आरक्षण उपवर्गीकरण होत नाही तोपर्यंत जुन मध्ये होणारी नोकर भरती करू नये, बदर समितीने अनुसूचित जातीतील ५९ जातींची आजची लोकसंख्या गृहीत धरून वर्गीकरण करावे, २० वर्षे झाले तरी शासनाने स्वीकारलेल्या ६८ शिफारशींपैकी एकाही शिफारशीची अंमलबजावणी केली नाही शासनाने बजेटसह तरतुद करून शिफारशींची अंमलबजावणी करावी २० एप्रिल २०२५ पर्यंत मागण्यांची अंमलबजावणी करा अन्यथा दि. २० मे पासुन आझाद मैदानावर आंदोलन करण्याचा इशारा देण्यात आला आहे. निवेदनावर उपसरपंच अनिल राधे कांबळे यांची स्वाक्षरी असुन निवेदन देतांना बिभिषण साबळे, कारभारी कांबळे, दत्ता कांबळे, आकाश लोखंडे, सचिन कांबळे, प्रशांत जाधव, प्रदिप कांबळे, स्वप्नील उमाप, बाळु कांबळे, करण जाधव, सागर कांबळे, सुहास क्षिरसागर, गोविंद आडागळे, सुमित कांबळे यांचेसह अनिलराधे मित्र मंडळाचे सदस्य उपस्थित होते.

## गोपीनाथ खोले यांचे दु:खद निधन



माजलगाव । प्रतिनिधी

शहरातील रंगार गल्ली भागातील रहिवासी असलेले गोपीनाथ केशवराव खोले वय ८५ वर्ष यांचे वृद्धापकाळाणे दि. २० मार्च गुरुवार रोजी पहाटे निधन झाले आहे.

शहरातील झेंडा चौक भागातील रंगार गल्ली येथील ज्येष्ठ रहिवासी असलेले गोपीनाथ केशवराव खोले हे खोले मामा म्हणून सर्वपरिचित होते. वयाच्या सोळाव्या वर्षापासून त्यांनी मोंढ्यात मोगरेकर किराणा,मराठा बियर बार,शेजुळ आडत दुकान, केचाळे डेकोरेशन, कॅसेट,पान सेंटर, भांडी भंडार आदी ठिकाणी काम केलेले आहे तर न्यायालयात अनेक वेळा त्यांनी केलेला हिशोब ग्राह्य धरला जायचा.त्यांच्या पार्थिवावर सिंदफना नदी तीरावरील स्मशानभूमीत दुपारी ४:०० वाजता अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या पश्चात पत्नी,दोन भाऊ, भाऊजया,दोन मुले,चार मुली,दोन पुतणे,सहा पुतण्या, जावई,सुना, नातवंडे,पतवंडे असा मोठा परिवार आहे.येथील प्रेस फोटोग्राफर प्रसाद खोले व प्रशांत खोले यांचे ते वडील तर सेवानिवृत्त ग्रामविकास अधिकारी प्रभाकर खोले यांचे ते मोठे बंधू होत.

## अग्नीवीर सैन्य भरतीसाठी ऑनलाईन नोंदणी

बीड । प्रतिनिधी

अग्निवीर योजने अंतर्गत वर्ष २०२५-२६ साठी होणाऱ्या अग्नीवीर भर्तीसाठी अविबाहित पुरुष आणि अविवाहित महिला उमेदवारांसाठी ऑनलाईन पद्धतीने अर्ज करण्यासाठीची अधिसूचना ... या वेबसाईट वर प्रसिद्ध करण्यात आली आहे. ऑनलाईन अर्ज स्वीकारण्याची तारीख १२ मार्च ते १० एप्रिल राहील. सामान्य प्रवेश परीक्षा संभवता जून महिन्यात प्रसिद्ध करण्यात येईल. हे भर्ती अर्ज अहिल्यानगर, बीड, लातूर, धाराशिव, पुणे आणि सोलापूर जिल्ह्यातील उमेदवार १२ मार्च ते १० एप्रिल पर्यंत भरू शकतात. तरी बीड जिल्ह्यातील जास्तीत जास्त पात्र उमेदवारांनी या संधीचा फायदा घेऊन दि. १० एप्रिल पूर्वी नोंदणी करावी, असे आवाहन जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी ले. कर्नल शरद पांढरे (नि.) यांनी केले आहे.

## जीवनात मिळालेल्या प्रत्येक संधीचे रुपांतर यशात करा - डॉ.राजेश इंगोले



अंबाजोगाई । प्रतिनिधी

वाट पाहणाऱ्या लोकांना जीवन संधी नाही तर संकटांची भेट देते त्यामुळे वाट पाहणाऱ्या लोकांच्या वाट्याला प्रयत्न करून नेणाऱ्या विजेत्यांनी जेवढे सोडलं आहे. त्यावरच समाधान मानावे लागत. त्यामुळे आयुष्यामध्ये वाट पाहण्यापेक्षा संधी निर्माण करून, मिळालेल्या संधीचे सोने करून आपल्या जीवनामध्ये प्रगतीकडे, यशाकडे वाटचाल केली पाहिजे असे प्रतिपादन सुप्रसिद्ध व्याख्याते मानसोपचार तज्ज्ञ डॉ.राजेश इंगोले यांनी केले.

अंबाजोगाई येथील व्यंकटेश नर्सिंग स्कूल येथे लॅम्प लाईटनिंग व विद्यार्थ्यांना वैद्यकीय सेवेची शपथग्रहण सोहळ्यामध्ये नर्सिंग कॉलेजच्या मुलांना मार्गदर्शन करतांना ते बोलत होते. यावेळी विचारमंचावर संस्थेचे प्राचार्य धनंजय शिंदे तसेच नर्सिंग महाविद्यालयाचे विभागप्रमुख प्रा.सूर्यवंशी यांची प्रमुख उपस्थिती होती. आयुष्यात कष्ट करण्याची तयारी विद्यार्थ्यांमध्ये असली पाहिजे तरच जीवनामध्ये यश मिळते वैद्यकीय सेवांमध्ये व्यक्तिमध्ये सेवा, समर्पण, त्याग, साहस , प्रसंगवधान, बलिदान, प्रेम, सहकार्य, बंधुत्व हे गुण असले पाहिजेत. वैद्यकीय क्षेत्रामध्ये पाऊल टाकण्याआधी प्रत्येक विद्यार्थ्याने स्वतःमध्ये हे गुण आत्मसात करण्याची प्रक्रिया पूर्ण करण्याचा पप्रयत्न करावा आणि स्वतःला ट्रान्सफॉर्म करून वैद्यकीय सेवेसाठी तयार करून घ्यावे अशी अपेक्षा डॉ.राजेश इंगोले यांनी व्यक्त केली. वैद्यकीय क्षेत्रामध्ये काम करत असताना माणुसकी हा गुण सदैव जागृत ठेवला पाहिजे त्यामुळे सेवा करणारा वैद्यक किंवा वैद्यकीय शाखेतील विद्यार्थी हे जात, धर्म, पंथ, लिंगभेद, गरिबी, श्रीमंती हा भेद बाजूला सारून, रूग्णाला रूग्ण मानून त्याची सेवा करेल. कोणतेही शास्त्र हे परिपूर्ण नसते, जगामध्ये दररोज नवनवीन संशोधन होत असते त्यानुसार त्या शास्त्राला बदलून घ्यावे लागते. जुन्या संकल्पना, धारणा, सूत्रे हे बदलल्यास नवीन शास्त्रशुद्ध व सिद्ध झालेल्या गोष्टींना प्रमाण मानून त्या गोष्टींना स्वीकारावे लागते. हा बदल आणि ही मानसिकता प्रत्येक वैद्यकीय शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांमध्ये असली पाहिजे. वैद्यकशास्त्र हे तीव्र गतीने बदलत जाणारे शास्त्र आहे. अत्याधुनिक उपचार पद्धती, अत्याधुनिक तंत्रज्ञान हे दररोज बदलत आहे त्यामुळे वैद्यकीय विद्यार्थ्यांनी हे अत्याधुनिक ज्ञान आत्मसात करून त्याचा उपयोग समाजासाठी करणे आवश्यक आहे, असे प्रतिपादन डॉ.राजेश इंगोले यांनी यावेळी केले. कार्यक्रमाची सुरूवात डॉक्टर राजेश इंगोले व मान्यवरांच्या हस्ते राष्ट्रमाता जिजाऊ व फ्लोरेन्स नाइटिंगेल यांच्या प्रतिमांना पुष्पहार अर्पण करून करण्यात आली. यावेळी सर्व विद्यार्थ्यांना वैद्यकीय सेवेची शपथ मान्यवरांच्या हस्ते देऊन लॅम्प लाईटनिंग करून करण्यात आली. यावेळी प्राचार्य धनंजय शिंदे, प्रा.सुर्यवंशी, नर्सिंगचे अधिव्याख्याता प्रा.सोळंके व प्रा.लोमटे यांची ही समायोचित भाषणे झाली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्रीमती पवार यांनी केले तर उपस्थितांचे आभार प्रा.सोळंके यांनी मानले.

## आत्महत्या केलेल्या शिक्षकाच्या कुटूंबाला सुप्रिया सुळे यांनी दिला आधार



अंबाजोगाई - प्रतिनिधी

१८ वर्षापासुन पगार नाही म्हणून आश्रम शाळेतील शिक्षक धनंजय नागरगोजे यांनी आत्महत्या केली. या कुटूंबाला खा.सुप्रिया सुळे यांनी दिलासा देत दोन्ही मुलांचा शैक्षणिक खर्च उचलण्याचा शब्द देत त्या विधवा महिलेसही रोजगार उपलब्ध करून देवू असा कृतीशिल आधार सुप्रिया सुळे यांनी दिला. राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष शरद पवार गटाचे प्रदेश उपाध्यक्ष डॉ.नरेंद्र काळे यांनी देवगाव येथे या नागरगोजे कुटूंबियांची भेट घेतली व त्यांनी भ्रमणध्वनीवर खा.सुप्रिया सुळे यांच्याशी या कुटूंबाचा संपर्क करून दिला. यावेळी या कुटूंबियांशी संवाद साधताना सुप्रिया सुळे यांनी या कुटूंबाला दिलासा दिला.

केज तालुक्यातील धनंजय नागरगोजे हे आश्रम शाळेवर शिक्षक होते. आठरा वर्षापासुन पगार न मिळाल्याने त्यांनी आत्महत्या केली. आत्महत्या करताना त्यांनी आपल्या तीन वर्षाची मुलगी व जन्म घेणार्या आपत्यांना पत्र लिहिले होते. हे प्रकरण बरेच गाजले. यानंतर बुधवारी राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष शरद पवार गटाचे पद्वीधर सेलचे अध्यक्ष डॉ.नरेंद्र काळे यांनी देवगाव येथे जावून नागरगोजे कुटूंबियांची भेट घेतली. यावेळी त्यांनी सुप्रिया सुळे यांच्याशी संपर्क साधून या कुटूंबियांशी संवाद साधला व मदतीचे आश्वास साधले.

# शेतातच समजणार पिकांवरील रोगाचा प्रादुर्भाव; शिवाजी विद्यापिठात एआय तंत्रज्ञानाद्वारे संशोधन



कोल्हापूर : पिकांवरील रोगाचा प्रादुर्भाव आता शेतातच समजणार आहे. त्यासाठी संशोधनातून एआय तंत्रज्ञानाच्या आधारित एअर सॅम्पलर हे उपकरण शवाजी विद्यापीठ कार्यक्षेत्रातील संशोधकांनी केले आहे. एअर सॅम्पलरचे संशोधन नावीन्यपूर्ण आणि शेतकऱ्यांना उपयुक्त असून, या संशोधनाचे डिझाईन पेटंट संशोधकांना मिळाले आहे. पुढील काळात त्यावर उपयुक्तता पेटंटही मिळविण्याचा मानस आहे. अशी माहिती विद्यापिठाचे सहायक ग्रंथपाल डॉ. शिवराज थोरात यांनी माहिती दिली.

विविध पिकांवर सापडणारे आणि हवेतून संक्रमण करू शकणारे वेगवेगळ्या रोगांचे विषाणू शोधण्यासाठी आणि ओळखण्यासाठी टिळक एअर सॅम्पलर वापरला जातो. हे सॅम्पलर शेतात ठेवून सॅम्पल गोळा केले जातात. त्यानंतर प्रयोगशाळेमध्ये आणून तज्ज्ञांच्या मदतीने ओळखले जातात. अशी आजपर्यंतची प्रक्रिया आहे. असे डॉ. थोरात म्हणाले. तसेच या नवीन संशोधनानुसार टिळक सॅम्पलरमध्ये कृत्रिम बुद्धिमत्ता तंत्रज्ञानाचा वापर केला आहे. शेतकऱ्यांना शेतामध्येच पिकांवर कोणत्या प्रकारच्या रोगाचा प्रादुर्भाव झाला आहे, हे ओळखता येईल. त्यानुसार त्वरित उपाययोजना करता येतील, असे डॉ. थोरात यांनी सांगितले.

या संशोधनात शिवाजी विद्यापीठाशी संलग्नित फलटण एज्युकेशन सोसायटीच्या श्रीमंत भैयासाहेब राजेमाने महाविद्यालय, म्हसवड येथील डॉ. सुजित जाधव, कृष्णा महाविद्यालय, रेठरे येथील डॉ. सुनीता जाधव, विद्यापीठाच्या बॅरिस्टर बाळासाहेब खर्डेकर ज्ञानस्रोत केंद्राचे सहायक ग्रंथपाल डॉ. शिवराज थोरात, लंडनच्या क्विन्स मेरी युनिव्हर्सिटीत एम.एस. (ए.आय.) चे शिक्षण घेत असलेले ऋतुराज जाधव आणि राजारामबापू इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी, इस्लामपूर येथे बी.ई. (इलेक्ट्रिकल) चे शिक्षण घेत असलेले पृथ्वीराज जाधव यांनी या संदर्भातील संशोधन केले आहे. त्यांच्या 'ए.आय. बेस्ड डिव्हाईस फॉर डिटेक्शन ऑफ प्लांट डिसिजेस' या संशोधनाला भारत सरकारच्या पेटंट कार्यालयाकडून जाहीर झाले आहे.

## जनावरांच्या नाकातील रक्तस्त्राव, कडव्या आजाराचे नियंत्रण



उन्हाळ्यात पशुपालकांना हिरव्या चाऱ्याची टंचाई,पिण्याच्या पाण्याची कमतरता तसच वाढलेली उष्णता अशा अनेक समस्यांना सामोरे जावे लागते. अशा परिस्थितीत जनावरांना अनेक आजार होण्याची शक्यता असते. अति उष्णतेमुळे माणसांप्रमाणेच जनावरांच्या नाकातून सुद्धा रक्त येते. नाकातील हा रक्तस्त्राव संकरित जनावरांमध्ये मोठ्या प्रमाणात दिसून येतो. यावर उपाय म्हणून जनावराच्या डोक्यावर थंड पाणी ओतावे.

जनावरांना भरपूर थंड पाणी आणि हिरवा चारा द्यावा. जनावरे झाडाखाली किंवा गोठ्यामध्ये सावलीत राहतील याची काळजी घ्यावी. रक्तस्त्राव थांबत नसेल तर पशुतज्ज्ञांच्या सल्ल्याने जनावरांना जीवनसत्व क आहारातून किंवा औषधातून द्यावे. जास्त उन्हामुळे जनावरांच्या कातडीला कडव्या आजार होतो. ज्या जनावरांच्या कातडीचा रंग पांढरा असतो त्या जनावरांमध्ये या आजाराचा प्रादुर्भाव जास्त दिसतो. कारण पांढरा रंग असणाऱ्या जनावरांच्या कातडीत मेलेनीन नावाचा घटक कमी प्रमाणात असतो. चाऱ्याच्या कमतरतेमुळे भुकेपोटी जनावर गाजर गवत खातात आणि अशी जनावरे सूर्यप्रकाशात अधिक वेळ राहिली असता जनावरांना कडव्या हा आजार होतो. गाजर गवतातील विषारी घटक आणि कडक उन्हाचा परिणाम कातडीवर दिसून येतो. यावर उपाय म्हणून जनावरांना सावलीत बांधावे. जनावरे गाजर गवत खाणार नाहीत याची काळजी घ्यावी. त्याना भरपूर प्रमाणात थंड पाणी द्यावं.याशिवाय पशुवैद्यकाच्या मार्गदर्शनाखाली उपचार घ्यावेत. हिरव्या चाऱ्याआभावी बरेच पशुपालक जनावरांना उसाचे वाढे खाऊ घालतात. वाढे जास्त खाऊ घातल्यामुळे त्यातील ऑक्झलेट खनिज आणि जनावरांच्या शरीरातील कॅल्शियम एकत्र होऊन लघवी वाटे निघून जाते. त्यामुळे जनावराच्या शरीरातील कॅल्शियमची पातळी कमी होते. त्यामुळे जनावरांना मिल्क फिव्हर हा आजार होतो. यामुळे जनावर थकून एकदम खाली बसतात. शरिराचे तापमान कमी होते. रवंथ करणे बंद होते. जनावरे खात नाहीत. दूध देणे कमी होते. शरीर थंड पडते. जनावरे मान टाकून बसतात यावर तातडीने पशुवैद्यकाकडून उपचार करून घ्यावेत. अशा प्रकारे काळजी घेतल्यास जनावरे निरोगी आणि उन्हातही सुखरूप राहतील.

## तणनाशकाशिवाय शेतातील तण काढून टाकण्याच्या पद्धती

तण ही शेतकऱ्यांची सर्वात मोठी समस्या आहे. बियाणे रोपांचे रूप घेतल्यानंतर, शेतकऱ्यांसाठी अडथळा म्हणून शेतात तण वाढू लागतात. कारण तण वनस्पतीला दिलेले सर्व पोषण घेतात, परिणामी झाडांना कमी पोषण मिळते, पीक उत्पादनात घट होते. म्हणूनच पिकांमध्ये तण रोखण्यासाठी आधीच पावले उचलली पाहिजेत, तरीही शेतकऱ्यांच्या शेतात तण उगवल्यास त्यांच्यासाठी तण काढणे आवश्यक आहे. शेतकऱ्यांनी पेरणीनंतर २० ते २५ दिवसांनी प्रथम खुरपणी करावी, जेणेकरून शेत तणमुक्त होईल. आता शेतकर्यांच्या सोयीसाठी अनेक कृषी यंत्रे बनवली आहेत, ज्यांच्या मदतीने अत्यंत कमी वेळ आणि मनुष्यबळावर शेतातील तण नष्ट करता येते.

शेतातून तण कसे काढायचे :

१) हाताने तण काढणे - शेतातील तण काढण्याच्या अनेक पद्धती आहेत, त्यापैकी एक म्हणजे हाताने तण काढणे. तुमच्या शेताचे क्षेत्रफळ कमी असेल आणि कमी खर्चात तुम्हाला मजूर उपलब्ध असेल तेव्हा हाताने खुरपणी करण्याची पद्धत अवलंबावी.

२) खोल मशागत करून - उन्हाळ्यात शेतात खोल नांगरणी करावी, त्यामुळे तणांच्या बिया येतात व कडक सूर्यप्रकाशामुळे बियाणांची उगवण क्षमता नष्ट होते व पिकांतील तणांची समस्या संपते. या पद्धतीचा अवलंब केल्याने पिकांवर कीड व रोगांचा प्रादुर्भावही कमी होतो. उन्हाळी हंगामात पिके जेथे घेतली जातात तेथे या तंत्राचा अवलंब करावा हे लक्षात ठेवा.

३) होईंग द्वारा - आता शेतकऱ्यांच्या सोयीसाठी मॅन्युअल मशीन्सही आल्या आहेत. त्यामुळे शेतकऱ्यांचा वेळही वाचतो आणि मजूरही कमी होतो. या यंत्रांच्या साह्याने तणांचे मोठ्या प्रमाणात नियंत्रण करता येते. परंतु या पद्धतीचा अवलंब केवळ ओळीत पिके पेरल्या जातात. ट्वीन व्हील वापरून ओळींमध्ये उगवलेले तण नष्ट करणे शक्य आहे.

४) योग्य पीक रोटेशनचा अवलंब करून - तेच पीक शेतात वारंवार पेरल्यास तणांचा प्रादुर्भाव वाढतो. म्हणजे, सोप्या शब्दात, त्याच शेतात गहू पुन्हा पुन्हा पेरल्याने, हरभरा पेरणीमुळे, बथुआचा प्रादुर्भाव वाढतो, परिणामी काही काळानंतर त्यांची संख्या इतकी वाढते की हरभरा उत्पादनाच्या जागी. त्या शेतात आपण तण घेऊ. त्यामुळे एकाच शेतात एकच पीक पुन्हा पुन्हा पेरता कामा नये, त्याऐवजी योग्य पीक आवर्तनाचा अवलंब करणे आवश्यक आहे.



## केळी पिकातील 'सिगाटोका' रोग



केळी पिकामध्ये अनेक बुरशीजन्य व जीवाणूजन्य रोगांचा प्रादुर्भाव आढळून येतो. ज्यामध्ये मुख्यत: सिगाटोका, रायझोम रॉट, ॲन्थरॅक्नोज, बुरशी व जीवाणूजन्य मर रोग, मोझॅक विषाणूजन्य रोग, बंची टॉप इत्यादी महत्त्वाचे रोग दिसून येतात. या रोगांमुळे केळी पिकाचे मोठे नुकसान होते. हे टाळण्यासाठी केळी पिकामध्ये येणाऱ्या रोगांची ओळख, प्रादुर्भावाची लक्षणे माहिती असणे गरजेचे आहे.

सिगाटोका हा रोग सर्वात प्रथम १९०२ मध्ये फिजी या देशामध्ये सिगाटोका व्हॅली या ठिकाणी आढळून आला होता. त्यानंतर १९१३ मध्ये या रोगाचा प्रादुर्भाव त्या ठिकाणी खूप जास्त प्रमाणात दिसून आला. यावरून या रोगाला 'सिगाटोका' असे नाव पडले. या रोगाचे पिवळा सिगाटोका आणि काळा (ब्लॅक) सिगाटोका असे दोन प्रकार पडतात. या दोन्ही रोगांची लक्षणे व रोग निर्माण करणारी बुरशी ही वेगवेगळी असते.

रोगाची ओळख : - रोगाचे नाव - काळा (ब्लॅक) सिगाटोका. रोगाचे कारण - हा रोग बुरशीच्या प्रादुर्भावामुळे होतो. या रोगामुळे केळी पिकाचे सुमारे १०० टक्क्यांपर्यंत नुकसान होऊ शकते. लक्षणे : या रोगाची लक्षणे सुरूवातीला नवीन पानांवर दिसून येतात. वरील बाजूने तीन ते चार क्रमांकाच्या पानांवर ही लक्षणे दिसू लागतात. सुरूवातीला पानावर स्पिंडल आकाराचे फिक्कट पिवळे ठिपके किंवा छोट्या रेषा दिसू लागतात. ही लक्षणे पानांच्या आडव्या शिरांना समांतर असतात. काही दिवसातच हे ठिपके अर्धा ते एक सेंटीमीटर इतके मोठे होतात. ठिपक्यांचा मधला भाग राखेडी, तर कडा गर्द तपकिरी ते काळ्या रंगाच्या असतात. बाजूचा भाग फिक्कट पिवळसर दिसतो. दोन ठिपक्यांतील भाग फिक्कट हिरवा दिसतो. राखेडी भागामध्ये लहान काळ्या रंगाचे कोनीडीओफोर दिसतात. कालांतराने हे ठिपके एकमेकांत मिसळून संपूर्ण पान काळे दिसू लागते. म्हणून याला 'काळा सिगाटोका' असे म्हणतात. संपूर्ण पान काळे होऊन नंतर सुकून जाते. पानांची संख्या कमी झाल्याने त्याचा विपरीत परिणाम फळांच्या गुणवत्तेवर होतो.

पोषक वातावरण : या रोगासाठी पावसाळी, आर्द्रतायुक्त, धुके असणारे हवामान पोषक असते. तापमान २० ते ३० अंश सेल्सिअस, जास्त आर्द्रता असे वातावरण रोगासाठी अत्यंत पोषक ठरते. रोगाची लागण होण्यासाठी पान ओले असणे गरजेचे असते. अशा वातावरणात रोगाच्या बीजाणूंचे अंकुरण चांगले होते. सकाळी दव असेल, तर हा रोग जास्त प्रमाणात दिसून येतो. बागेमध्ये पाणी साचून राहणे व पोटॅश या अन्नद्रव्यांची कमतरता असेल तरी हा रोग जास्त प्रमाणात येतो.

रोग कसा निर्माण होतो : या रोगाचे तंतू किंवा अलैंगिक बीजाणू इतर केळी किंवा पॅराकीट फ्लॉवरच्या झाडावर जिवंत राहतात. त्यांच्यापासून मुख्य पिकावर नवीन रोगाची लागण होते. ज्या वेळी केळी किंवा पॅराकीट फ्लॉवरचे पिके नसेल अशावेळी लैंगिक बीजाणू (ॲस्कोस्पोर) हे जमिनीत, जुन्या पीक अवशेषांवर जिवंत राहतात. नवीन पिकांची लागवड झाल्यावर हे ॲस्कोस्पोर हे वारा, कीटक, पाणी यांच्यामार्फत मुख्य पिकांवर पोचतात. पोषक वातावरण तयार होताच, मुख्य पिकाच्या पानांवर रोगाची लागण होते. याला 'प्राथमिक लागण' म्हणतात. रोगाची लागण झाल्यानंतर रोगाची लक्षणे ३ ते ४ दिवसांनी दिसून येण्यास सुरुवात होते. या लक्षणांमधील ठिपक्यांच्या खालील बाजूने अनेक कोनिडीओफोर असतात, यामध्ये अनेक बीजाणू तयार होतात. हे बीजाणू हवेमार्फत इतर यजमान पिकांवर जातात. व रोगाचा प्रसार होतो. यालाच 'दुय्यम लागण' असे म्हणतात.

सूक्ष्मदर्शिके खाली काय दिसते? : सूक्ष्मदर्शिकेखाली रोगाचे बीजाणू () स्पष्टपणे पाहू शकतो. हे बीजाणू लांब निमुळते असून त्यामध्ये चार ते पाच पेशी भित्तिका असतात. या बिजाणूची लांबी ०.०२ मिमी ते ०.०३ मिमी (२० मायक्रोमीटर), तर रुंदी ०.००२ मिमी असते.

नियंत्रणाचे उपाय : पिकाची फेरपालट करावी. रोपांची लागवड जास्त जवळ करू नये. लागवड अंतर जास्त ठेवावे. शेतात हवा खेळती असावी. पाने ओली राहणार नाहीत याची काळजी घ्यावी. नवीन रोगग्रस्त पाने शेताबाहेर नेऊ नष्ट करावीत. नवीन फुटणारे कोंब वेळोवेळी काढावेत. पिकामध्ये पोटॅश या अन्नद्रव्याची कमतरता भासणार नाही याची काळजी घ्यावी. बागेमध्ये सिंचनाचे काटेकोर नियोजन करावे. खूप जास्त प्रमाणात पाणी देऊ नये. सिंचनासाठी ठिबक सिंचनाचा वापर करावा. पावसाचे पाणी बागेत साचणार नाही याची काळजी घ्यावी. निचरा होण्याची व्यवस्था करावी. जमिनीवर ट्रायकोडर्मा व्हिरीडी या जैविक बुरशीनाशकाची फवारणी करावी. पोषक वातावरणात शिफारस केलेल्या बुरशीनाशकांचा वापर करावा. सकाळी दव पडत असेल तर स्पर्शजन्य बुरशीनाशकांचा फवारणी किंवा धुरळणीद्वारे वापर करावा. रोगाच्या प्रादुर्भावाची लक्षणे दिसून आल्यानंतर त्वरित शिफारस केलेल्या आंतरप्रवाही व स्पर्शजन्य बुरशीनाशकांची फवारणी करावी.

## दिन विशेष

### जागतिक दिवस
### जागतिक वनदिन
### जागतिक वन्य दिन
### विश्व वंशभेद निर्मूलन दिवस

### महत्वाच्या घटना

१५५६ : ख्रिश्चन धर्मात सुधारणांची आवश्यकता आहे असे सांगणार्या आर्चबिशप थॉमस क्रॅनमर यांना शिक्षा म्हणून जिवंत जाळण्यात आले.
१६८० : छत्रपती शिवाजी महाराजांनी रायगड जिल्ह्यातील कुलाबा किल्ल्याची बांधणी सुरु केली.
१८३६ : कोलकाता येथील राष्ट्रीय लायब्ररी( वाचनालय) नावाने प्रसिद्ध असलेल्या सार्वजनिक पुस्तकालयाची स्थापना करण्यात आली.
१८५८ : साली इंग्रज सेनापती सर ह्यू रोझ यांनी झाशीच्या राणी लक्ष्मीबाई राहत असलेल्या किल्ल्याला वेढा दिला होता.
१८७१ : ऑटो व्हॉन बिस्मार्क हे जर्मनीचा चॅन्सेलर बनला.
१८८७ : मुंबईमध्ये प्रार्थना समाजाची स्थापना करण्यात आली.
१९३५ : शाह रझा पेहलवी यांनी पर्शियाचे नाव ईराण करावे असे आवाहन केले.
१९७५ : सर्वप्रथम राष्ट्रपती फखरुद्दीन अली अहमद यांनी इंदिरा गांधी यांच्या विनंतीवरून कलम ३५२ अंतर्गत मध्यरात्री आणीबाणी जाहीर केली होती. सन १९७७ साली भारतातील आणीबाणी संपुष्टात आली.
१९७७ : भारतातील आणीबाणी संपुष्टात आली.
१९८० : अमेरिकेने मॉस्को ऑलिम्पिक खेळांवर बहिष्कार टाकला.
१९९० : नामिबियाला दक्षिण अफ्रिकेपासून स्वातंत्र्य मिळाले.
१९९२ : भारताची 'शंकूल' ही दुसरी पाणबुडी नौदलात सामील झाली
२००० : फ्रेंच गयानातील कोअरु येथून एरियन ५०५ या वाहकाद्वारे भारताचा इन्सॅट ३ बी हा उपग्रह यशस्वीपणे प्रक्षेपित करण्यात आला.
२००३ : जळगाव महानगरपालीकेची स्थापना.
२००६ : सोशल मीडिया साइट ट्विटर ची स्थापना झाली.

### जन्मदिवस । जयंती । वाढदिवस

१७६८ : फ्रेन्च गणितज्ञ व भौतिकशास्त्रज्ञ जोसेफ फोरियर यांचा जन्म. (मृत्यू: १६ मे १८३०)
१८४७ : कालजंत्रीकार बाळाजी प्रभाकर मोडक यांचा जन्म. (मृत्यू: २ डिसेंबर १९०६)
१८८७ : देशभक्त, क्रांतिकारक व भारतातील कम्यूनिस्ट पक्षाचे संस्थापक मानवेंद्रनाथ रॉय यांचा जन्म. (मृत्यू: २६ जानेवारी १९५४)
१९१२ : चित्रपट निर्माता, लेखक, दिग्दर्शक आणि प्रसिद्ध संगीतकार ख्वाजा खुर्शीद अनवर यांचा जन्मदिन.
१९१६ : बिस्मिल्ला खाँ, भारतीय सनईवादक.
१९२२ : बांगलादेशचे प्रथम प्रधानमंत्री 'मुजिबुर रहमान' यांचा जन्मदिन.
१९२३ : सहज योग च्या संस्थापिका आणि अध्यात्म गुरु निर्मला श्रीवास्तव यांचा जन्म. (मृत्यू: २३ फेब्रुवारी २०११)
१९३७ : भारतीय हॉकी खेळाडू मोहम्मद जाफर यांचा जन्मदिन.
१९४४ : केरळ राज्याचे विद्यमान मुख्यमंत्री पिनाराय विजयन यांचा जन्मदिन.
१९७८ : अभिनेत्री राणी मुखर्जी यांचा जन्म.

### मृत्यू । पुण्यतिथी । स्मृतिदिन

१८२७ : मध्य भारतातील ग्वाल्हेर राज्याचे राजा श्रीमंत दौलतराव शिंदे यांचे निधन.
१९५२ : शिक्षणतज्ज्ञ आणि हिंदी लेखक व साहित्यिक केशव प्रसाद मिश्र यांचे निधन.
१९७३ : कोशकार यशवंत रामकृष्ण दाते यांचे निधन. (जन्म: १७ एप्रिल १८९१)
१९७३ : आतुन कीर्तन वरुन तमाशा या नाटकाचा प्रयोग करत असतानाच नटवर्य शंकर घाणेकर यांचे हृदयविकाराच्या झटक्याने निधन झाले.
१९८५ : ब्रिटिश अभिनेता सर मायकेल रेडग्रेव्ह यांचे निधन. (जन्म: २० मार्च १९०८)
२००१ : दक्षिण कोरियन कंपनी ह्युंदाई चे स्थापक चुंग जू-युंग यांचे निधन. (जन्म: २५ नोव्हेंबर १९१५)
२००३ : भारतीय लेखक शिवानी यांचे निधन. (जन्म: १७ ऑक्टोबर १९२३)
२००५ : चित्रपट दिग्दर्शक, पटकथा व संवाद लेखक दिनकर द. पाटील यांचे निधन. (जन्म: ६ नोव्हेंबर १९१५)
२०१० : अर्थशास्त्रज्ञ व विनोदी लेखक पांडुरंग लक्ष्मण तथा बाळ गाडगीळ यांचे निधन. (जन्म: २९ मार्च १९२६)

## मटक्यात मशरूम लागवड करून मिळवू शकता चांगला नफा

अनेक शेतकरी मशरूमच्या लागवडीतून भरघोस नफा कमावत आहेत. यातून प्रेरणा घेऊन इतर शेतकरीही त्याच्या लागवडीकडे वळू लागले आहेत. मशरूमच्या लागवडीची सर्वात महत्त्वाची गोष्ट म्हणजे ती बाजारात सहज विकले जाते. यासोबतच तुम्ही मशरूमचे बिस्किट, नमकीन यांसारखे इतर अनेक प्रकार बनवून चांगला नफा कमवू शकता. पूर्वी लोक मशरूमची लागवड करण्यास संकोच करत होते. त्याची लागवड करणे खूप खर्चिक आहे, अशी त्यांची धारणा होती. यासाठी, एक योग्य सेटअप तयार केला जातो. पण तुम्ही कमी खर्चात तुमच्या घरच्या घरी मातीच्या मटक्याच्या ऑयस्टर मशरूम (धिंगरी मशरूम) वाढवू शकता.

मशरूम लागवडीसाठी वेळ बहुतेक लोक मशरूमच्या लागवडीसाठी आयताकृती साचे बनवतात. ही प्रक्रिया थोडी महाग आहे. अशा मध्ये शेतकरी मटक्यातही शेतकरी मशरूम वाढवू शकतात. त्यासाठी आधी मटका घ्यावा लागेल. मातीच्या मटक्याला चारी बाजूंनी लहान छिद्रे पाडावीत. यानंतर, त्या भांड्यात ओलावा-समृद्ध पेंढा (भुसा ) भरा. त्यानंतर मशरूमच्या बिया भांड्यात टाका. भांड्याचे तोंड जाड कापडाने बांधावे, जेणेकरून ओलावा भांड्यातून बाहेर पडणार नाही. यानंतर, ते भांडे १२ ते १५ दिवस अंधाऱ्या खोलीत ठेवा. सुमारे १५ दिवसांत, मशरूमचे स्पॉन बिया पूर्णपणे पसरतील आणि विकसित होतील. सुमारे ३ आठवड्यांनंतर, कापड काढा आणि भांडे पहा. तुम्हाला छिद्रातून मशरूमची लहान पांढरी कळी दिसेल.

# सह्याद्री देवराई वनप्रकल्प जगवण्यासाठी वनप्रेमींच्या पुढाकाराने पाण्याचे टँकर

## पुन्हा एकदा वनप्रकल्प आगीच्या भक्ष्यस्थानी: डोकेवाडा तलावातुन कायमस्वरूपी पाणीपुरवठ्याची गरज






बीड। प्रतिनिधी

बीड तालुक्यातील पालवण येथील डोंगरावर २०१७ साली मराठी अभिनेते सयाजी शिंदे आणि सेने पटकथा लेखक अरविंद जगताप यांच्या प्रयत्नातून उभारलेल्या पहिले जागतिक संमेलन जागतिक वृक्ष संमेलन भरलेल्या सह्याद्री देवराई वन प्रकल्पाकडे जिल्हा प्रशासन व वनविभागाच्या दुर्लक्षामुळे घरघर लागली असुन वाळवंट होण्याच्या स्थितीत असुन पाण्याअभावी झाडे वाळली आहेत. याची दखल घेत डॉ . प्रदीप शेळके आणि त्यांचे सहकारी वृक्षप्रेमींनी टँकरद्वारे झाडांसाठी पाणीपुरवठ्याची व्यवस्था करत जागतिक वन दिनाच्या निमित्ताने स वनप्रकल्प वाचवण्यासाठी सहकार्य करावे अशी हाक दिली आहे. दुसरीकडे काल रात्री लागलेल्या आगीत पुन्हा झाडांची हानी झाली आहे. सह्याद्री देवराई वनप्रकल्पातील झाडांसाठी पाण्याचा प्रश्न कायमस्वरूपी सुटावा यासाठी पर्यावरण मंत्री पंकजाताई मुंडे यांनी डोकेवाडी साठवण तलावातुन पाइपलाइन करून कायमस्वरूपी तोडगा काढावा अशी मागणी सामाजिक कार्यकर्ते डॉ.गणेश ढवळे लिंबागणेशकर यांनी केली आहे.

सह्याद्री देवराई वनप्रकल्पातील झाडांची पाण्याअभावी दुरावस्था झाली असुन झाडे वाळुन करण्याच्या अवस्थेत आहेत. आठवड्यात २५ हजार लिटरचे कमीत कमी ३ टँकरद्वारे पाणीपुरवठा करण्यात येणार असुन आजपासून सुरुवात केली आहे. यासाठी अनिकेत कुलकर्णी, सुप्रिया कुलकर्णी, वैभव जाधव, डॉ.अक्षय भोपळे, आनंद मुंदडा, डॉ.अभिजित थेटे, डॉ.अनुराग पांगरीकर, डॉ.सिताराम आळणे,गोपवाड,जेठाराम प्रजापती, सलीम सय्यद,सुरवसे भाऊ,काळु बेग, अँड.राज पाटील, मनोज पवार,यांनी आर्थिक योगदान दिले आहे. सह्याद्री देवराई वनप्रकल्पातील अडचणीच्या अनुषंगाने व्हिडिओ कॉल द्वारे सयाजी शिंदे यांच्याशी बोलणे झाले असून येत्या १ तारखेला वनप्रकल्पाची पाहणी करण्यासाठी ते येणार असुन जिल्हा प्रशासन, वनविभाग व वनप्रेमी, पर्यावरण प्रेमी यांच्या सोबत विचार विनिमय करून कायमस्वरूपी तोडगा काढणार असल्याचे त्यांनी सांगितले.असे डॉ.प्रदीप शेळके यांनी सांगितले.काल रात्री साडे ९ च्या सुमारास सह्याद्री देवराई वनप्रकल्पातुन आगीचे लोट उठल्यानंतर लक्षात येताक्षणी वनमजूर जयराम काळे, वनरक्षक शेषेराव राऊत,वनमजुर पदमाकर मस्के यांच्या प्रसंगावधानामुळे आग लवकरच आटोक्यात आणली. २ आर वनक्षेत्रातील झाडे आगीत भस्मसात झाली आहेत. रात्री अपरात्री याठिकाणी येणाऱ्या समाजकंटकांमुळे असे प्रकार घडत असून रात्रपाळीसाठी वनकर्मचारी यांची आवश्यकता असल्याचे वनपाल देविदास गाडेकर यांनी सांगितले. सह्याद्री देवराई वनप्रकल्पातील झाडांसाठी कायमस्वरूपी पाणी पुरवठा व्हावा अशी मागणी तत्कालीन वन विभागीय अधिकारी के.एम.गिते यांनी करत ६७ लाख रुपये निधीची मागणी जिल्हाधिकारी दिपा मुधोळ मुंडे यांनी सहमती दर्शवली होती.परंतु तत्कालीन मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद बीड अजित पवार यांनी पालवण गावासाठी येणाऱ्या जलजीवन योजनेंतर्गत कामामधुन पाणीपुरवठा करता येईल त्यासाठी वेगळा निधी खर्च करण्याची आवश्यकता नसल्याचे मत नोंदवले त्यामुळे पुढे ती योजना रखडली. पर्यावरण मंत्री पंकजाताई मुंडे यांनी सह्याद्री देवराई वनप्रकल्पातील झाडांसाठी डोकेवाडा साठवण तलावातुन पाणीपुरवठा करण्यासाठी स्वतंत्र निधी देण्यात यावा ज्यामुळे कायमस्वरूपी हा प्रश्न मिटेल अशी मागणी केली आहे.

# अक्षय महाराज पिंगळे हे युवा कीर्तनरत्न पुरस्काराने सन्मानीत

फुलसांगवी । प्रतिनिधी

तुकाई ज्ञानपीठ पाले ता. अंबरनाथ जि. ठाणे यांच्यावतीने देण्यात येणारा युवा कीर्तनरत्न हा पुरस्कार बीड जिल्ह्यातील काटवटवाडी येथील रहिवासी असलेले हभप.अक्षय महाराज पिंगळे यांना जाहीर झाला असून मंगळवार दि.१८ रोजी हा पुरस्कार श्री.धर्मगुरू अमृता श्रम स्वामी महाराज (अमृत महाराज जोशी बीड )व विश्वनाथ महाराज वारिंगे श्री.भारतानंद सरस्वती स्वामी आदी दिग्गज मान्यवरांच्या हस्ते पिंगळे महाराज यांना प्रदान करून सन्मानित करण्यात आले आहे.

जगद्गुरु तुकाराम महाराज यांचा ३७५ वा ( शतकोत्तर वर्षानिमित्त ) वैकुंठ गमन सोहळा कोकणरत्न हभप. विश्वनाथ महाराज वारिंगे यांच्या संकल्पनेतून संत तुकाराम महाराज अध्यात्मिक सेवाभावी संस्था तुकाई ज्ञानपीठ पाले, ता.अंबरनाथ जि. ठाणे येथे मोठ्या थाटात पार पडला आहे. संस्थेच्या वतीने देण्यात येणारा युवा कीर्तनरत्न हा बीड जिल्ह्यातील नामांकित युवा कीर्तनकार म्हणून वारकरी सांप्रदायातील सर्व परिचित व्यक्तिमत्व म्हणून ओळख असलेले हभप.अक्षय महाराज पिंगळे (काटवटवाडी ) यांना जाहीर करण्यात झाला आहे . जगद्गुरु तुकाराम महाराज वैकुंठ गमन सोहळ्याच्या कार्यक्रमाचे औचित्य साधून बीड जिल्ह्यातील वारकरी सांप्रदायाची भूषण हभप अमृत महाराज जोशी तथा श्री.अमृत आश्रम स्वामी यांच्या कीर्तनाचे आयोजन करण्यात आले होते. या कीर्तनाच्या कार्यक्रमानंतर पुरस्कार प्रदान करण्याचा नेत्रदीपक सोहळा सोहळा घेण्यात आला. या सोहळ्या मध्ये कोकणरत्न प्रबोधन मार्तंड तथा संस्थेचे अध्यक्ष हभप. विश्वनाथ महाराज वारिंगे, हभप. अमृत महाराज जोशी(श्री.अमृताश्रम स्वामी) व अखिल भारतीय संत समितीचे भारतानंद सरस्वती स्वामी आदी मान्यवरांच्या हस्ते हभप.अक्षय महाराज पिंगळे यांना युवा किर्तनरत्न हा पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले आहे. यावेळी तालमणी विकास बेलुकर,गायक प्रकाश महाराज, कातकडे,सदानंद महाराज ,वैभव मनोहर कडु, मौनी बाबा,रत्नाकर महाराज विठ्ठल महाराज व पत्रकार बांधव उपस्थित होते.



### युवा कीर्तनकार म्हणून नावलौकिक

बीड जिल्हा म्हणजे वारकरी संप्रदायाची उभे पिक असे सर्वत्र संबोधले जात आहे. बीड जिल्ह्याच्या मातीमध्ये अनेक गुणवान मंडळी कीर्तनकार निर्माण झाले आहेत. श्री क्षेत्र नारायण गडाच्या पंचक्रोशीतील काटवटवाडी या छोट्या गावांमधून अध्यात्मिक नावलौकिक वाढवणारे हभप. अक्षय महाराज पिंगळे हे आपल्या वक्तृत्व कौशल्याने महाराष्ट्रभर एक युवा कीर्तनकार म्हणून ओळखले जात आहे. आपल्या कीर्तनातून समाज प्रबोधन, जनजागृती, वारकरी सांप्रदायातला अनुसरून संत विचाराची संत विचाराची प्रखर पेरणी करणारे पिंगळे महाराज हे बीड जिल्ह्यातच नव्हे तर महाराष्ट्रभर आपला नावलौकिक मिळवत आहेत. त्यांच्या या व्यक्तिमत्त्वामुळेच त्यांना युवा किर्तन रत्न हा पुरस्कार मिळाल्याची भावना त्यांचे मित्रपरिवार आणि अनुयायी व्यक्त करत आहेत.

# महावितरणने चालवलेला विजेचा लपंडाव केव्हा थांबणार?

## सामाजिक कार्यकर्ते अँड. मनोज संकाये यांचा सवाल

परळी। प्रतिनिधी

परळी शहरात गेल्या महिन्याभरापासून वारंवार वीजपुरवठा खंडित होत असून, यामुळे नागरिक व व्यावसायिक हैराण झाले आहेत. उन्हाची तीव्रता दिवसेंदिवस वाढत असताना वीजपुरवठ्यातील अनियमिततेमुळे उकाड्याने त्रस्त झालेल्या नागरिकांना अनेक अडचणींचा सामना करावा लागत आहे. मात्र, याकडे महावितरण दुर्लक्ष करत असल्याचा आरोप सामाजिक कार्यकर्ते अँड. मनोज संकाये यांनी केला आहे.

परळी शहरातील नागरिक व व्यावसायिकांना नियमित वीजपुरवठा मिळावा, यासाठी महावितरणने तातडीने उपाययोजना कराव्यात, अशी मागणी त्यांनी केली आहे. त्यांनी स्पष्ट शब्दांत सांगितले की, ‘‘वीज गेल्यानंतर दोन-दोन तास परत येत नाही. आली तरी किती वेळ टिकेल, याचा काहीही भरवसा नाही. या अनियमित वीजपुरवठ्यामुळे व्यावसायिकांचे मोठे नुकसान होत आहे. विशेषतः आईस्क्रीम, हॉटेल व इतर विजेवर अवलंबून असलेले व्यवसाय ठप्प होण्याच्या मार्गावर आहेत.तसेच, नागरिकांकडून भरमसाठ वीजबिले आकारली जात असताना, त्यांना २४ तास वीजपुरवठा मिळत नाही, ही गंभीर बाब असल्याचे त्यांनी नमूद केले. महावितरणचे वीज वितरण वेळापत्रक संपूर्ण कोलमडले असून, वीज केव्हा जाईल आणि केव्हा येईल, याचा काहीही ठावठिकाणा नाही. महावितरणने त्वरित हा विजेचा लपंडाव थांबवावा, अन्यथा मित्र मंडळाच्या वतीने महावितरण कार्यालयासमोर तीव्र आंदोलन करण्यात येईल,‘‘ असा इशाराही अँड. मनोज संकाये यांनी दिला आहे.

**नागरिकांची मागणी वीजपुरवठा सुरळीत करावा:** परळीतील नागरिकांनी महावितरणच्या या अनागोंदी कारभाराचा निषेध नोंदवत, विजेचे वेळापत्रक निश्चित करण्याची मागणी केली आहे. अन्यथा, आगामी काळात याविरोधात मोठे आंदोलन छेडले जाईल, असा इशारा देण्यात आला आहे.

# उमेदतर्फे बचत गटांचे जिल्हास्तरीय विक्री व प्रदर्शन

बीड । प्रतिनिधी

ग्रामविकास व पंचायत राज विभागाच्यावतीने उमेद महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान दिनांक २० मार्च २०२५ ते २४ मार्च २०२५ या कालावधीत वेळ सकाळी १० ते रात्री ११ वाजेपर्यंत उत्सव स्वयंसहायता समूहातील महिलांच्या प्रगतीचा, उत्सव महा खरेदीचा उत्सव, महा मेजवानीचा, गुढीपाडवा महोत्सव ईद बाजार व खाद्य जत्रा आणि जिल्हास्तरीय विक्री व प्रदर्शन २०२५ जिल्हा परिषद बीड येथे आयोजित करण्यात आलेले आहे.खास आकर्षण मसाले, खाद्यपदार्थ, हस्तकला, ग्रामीण कलाकुसर, ज्वेलरी तसेच शाकाहारी व मांसाहारी मेजवानी व खुप काही आयोजित करण्यात आलेले असून प्रवेश विनामुल्य आहे. तरी सर्व जनतेने याचा लाभ घेऊन एकवेळ अवश्य भेट द्यावी असे आवाहन डी आर डी ए च्या प्रकल्प संचालक संगीतादेवी पाटील यांनी केले आहे.

# जवळगाव येथील ग्रामस्थांचे उपोषण सुरूच

अंबाजोगाई। प्रतिनिधी

गंगामाऊली सोलर प्रायव्हेट लिमिटेड सोबत गट नं.२११ मधील जमीनीवरील केलेला करार रद्द करा या व विविध मागण्यांसाठी जवळगाव येथील ग्रामस्थांचे गेल्या चार दिवसांपासुन तहसील कार्यालयासमोर अमरण उपोषण सुरू आहे.




उपोषणार्थिनीळ दिलेल्या निवेदनात नमुद करण्यात आले आहे की, आम्ही जवळगाव येथील भूमिहीन शेतमजुर आहोत. येथील गट नं.२११ मधील सरकारी जमीनी आम्ही सन १९८१ पासुन वहिती करतोत व उदरनिर्वाह चालवतोत मात्र या जमीनीवर गंगामाऊली सोलर प्रा.लि. यांनी जमीनीवर केलेला करार रद्द करावा. बर्दापुर पोलिस स्टेशन येथे दाखल केलेले खोटे गुन्हे मागे घ्या. गट नं.२११ मधील वैयक्तीक क्षेत्र सोडून रिकाम्या जागेत सौर उर्जा प्रकल्प स्थालांतरीत करा, अशा विविध मागण्यांसाठी राजेभाऊ मुकुंद नामपल्ले, विजय लिंबाजी कांबळे, बाळासाहेब शेषेराव हारे, शंकर विठोबा आगळे, माणिक विठोबा आगळे, गोविंद तुकाराम मोहिमे यांच्यासह ग्रामस्थ आमरण उपोषणास बसले आहे.

# केरसुनीच्या व्यवसायातून मुलाला घडवले

## नाकलगाव चा संजय गायकवाड महाराष्ट्र सुरक्षा बलात दाखल

दिंद्रुड । प्रतिनिधी

आई-वडीलांनी गावोगावी व रानोमाळ भटकून केरसुनी (झाडू) बनवण्यासाठी लागणारी झाडी (सिंधीची पनाळी) तोडून बनवलेल्या झाडु - दुरडीच्या विक्रीतुन मिळणाऱ्या मोजक्या पैशातून मुलगा मोठा अधिकारी होण्याचे बघितलेले स्वप्न मुलाने पुर्ण केले. महाराष्ट्र सुरक्षा बलात नाखलगाव चा संजय दाखल होत आहे. सर्वसामान्य गायकवाड कुटुंबातील संजयच्या या यशाचं सर्वत्र कौतुक होत आहे.

माजलगाव तालुक्यातील नाखलगाव येथील लिंबाजी गायकवाड यांचा केरसुणी व दुरडी बनवण्याचा परंपरागत व्यवसाय आहे. अतिशय हालाखीच्या परिस्थितीत जीवन जगणाऱ्या गायकवाड यांना आपल्या मुलाने सरकारी अधिकारी व्हावे अशी इच्छा होती. आई जाईबाई व वडील मसाजी गायकवाड यांनी रानावनात भटकत झाडू व दुरडी साठी लागणारी सिंधीची झाडी गोळा करून व अपार कष्ट करून विक्री केलेल्या झाडू - दुरडी च्या विक्रीतून मिळालेल्या पैशातून संजय या मुलाचे संगोपन केले. गतवर्षी धुळे येथील एम एस एफ कॅम्प मध्ये सरावासाठी संजय दाखल झाला होता. त्याची ट्रेनिंग आता पूर्ण झाली आहे. मुंबई येथील महाराष्ट्र सुरक्षा बलात तो दाखल होणार आहे. यासाठी संजयने गेल्या पाच वर्षांपासून प्रचंड मेहनत घेतली. अंग मेहनती सोबत अभ्यास करण्यासाठी ग्रंथालयात १८ तास अभ्यास केला. वेळप्रसंगी ग्रंथालयात झोपल्याचे तो सांगतो. आपल्या आई वडिलांनी केलेल्या कष्टाचे फळ मला मिळाले असून भविष्यात गोरगरीब कुटुंबातील तरुणांनी राजकारणातील कार्यकर्ते होण्यापेक्षा आई-वडिलांचे कष्ट पाहून सुकर भविष्यासाठी योग्य तो निर्णय घेत परिश्रम करावे असं संजय सांगतो.





आम्ही संजय साठी घेतलेल्या अपार कष्टाचे फळ आम्हाला मिळाले आहे. आमच्या कष्टाचे चिज संजयने केले आहे. आता भविष्यात आमच्या मनातील त्याच्याबद्दलची काळजी मिटली आहे. त्याने सुखात जगावे,आमचा परंपरागत असलेल्या व्यवसायात अपार कष्ट आहेत. रानावनात व दारोदार भटकंती करण्याची वेळ माझ्या मुलावर येणार नाही यामुळे आम्ही आनंदी आहोत.

– लिंबाजी गायकवाड

आजकालची तरुणाई मोबाईलच्या पुर्णतः आहारी गेली आहे. आई वडिलांचे स्वप्न पूर्ण करण्याऐवजी रील स्टार्स होण्यात त्यांना रस आहे. मात्र संजय गायकवाड ने घेतलेली मेहनत व अपार कष्ट, त्याच्या आई - वडिलांनी दिलेली साथ ही सर्वसामान्य कुटुंबातील सर्वांसाठीच प्रेरणादायी आहे.

– बाबा कांबळे,सामाजिक कार्यकर्ते दिंद्रुड

# आबासाहेब हांगे यांना उत्कृष्ट प्राचार्य पुरस्काराचे वितरण



पाटोदा । प्रतिनिधी

येथील नवगण शिक्षण संस्था संचालित वसंतदादा पाटील कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयाचे प्राचार्य प्रोफेसर आबासाहेब हांगे यांना नुकताच महाराष्ट्र राज्य उच्च व तंत्र शिक्षण विभाग व महाराष्ट्र माहिती तंत्रज्ञान सहाय्यता केंद्र यांच्या संयुक्त विद्यमाने सुरु असणाऱ्या करिअर कट्टा उपक्रमाअंतर्गत बीड जिल्हा पातळीवरील उत्कृष्ट प्राचार्य पुरस्कार घोषित करण्यात आला होता.

१८ मार्च रोजी छत्रपती संभाजीनगर विभागाचा विभागीय पुरस्कार वितरण सोहळा देवगिरी महाविद्यालयात थाटात संपन्न झाला. याच सोहळ्यात प्राचार्य आबासाहेब हांगे यांना सदरील पुरस्काराचे वितरण करून गौरविण्यात आले. याप्रसंगी महाराष्ट्र माहिती तंत्रज्ञान सहाय्यता केंद्राचे अध्यक्ष यशवंत शितोळे, देवगिरी महाविद्यालयाचे प्राचार्य प्रोफेसर तेजनकर, करिअर कट्टा बीड जिल्हा प्रमुख प्राचार्य प्रोफेसर विधाते, पुण्याच्या मॉडर्न कॉलेजचे प्राचार्य प्रोफेसर मदने उपस्थित होते.

राज्य लोकतंत्र
शुक्रवार, दि.२१ मार्च २०२५ | ६

# बीड मतदारसंघातील प्रश्न आ.क्षीरसागरांनी सभागृहात गाजवले

## ग्रामीण भागातील थांबलेली कामे, बीड शहराचा पाणीपुरवठा आदी महत्वाचे प्रश्न मार्गी लावण्याची केली मागणी

**बीड | प्रतिनिधी**

**मतदारसंघातील महत्वाचे प्रश्न अर्थसंकल्पीय अधिवेशनात मांडून आ.संदीप क्षीरसागरांनी गुरूवारी (दि.२०) रोजी सभागृहाचे लक्ष वेधले. मतदारसंघात विकासकामांना मिळालेला निधी कोविड काळात वळविल्याने रखडलेली कामे, ग्रामीण भागातील शाळांची दुरूस्ती करणे तसेच विविध सोयी-सुविधा उपलब्ध करणे, रस्ते दुरुस्ती, पुल दुरूस्ती करणे आदी मुद्दे आ.क्षीरसागरांनी अधिवेशनात गाजवले.**




बीड मतदारसंघात असलेले श्री क्षेत्र कपीलधार देवस्थान हे संपूर्ण महाराष्ट्रातील भाविकांचे श्रद्धास्थान आहे. महाराष्ट्र आणि महाराष्ट्राबाहेरून देखील भाविक याठिकाणी येत असतात. कोवीड काळाअगोदर श्री क्षेत्र कपीलधार देवस्थानच्या विकासासाठी १०० कोटी रूपयांचा विकास आराखडा मंजूर झाला होता. परंतु कोवीडच्या महामारी काळापासून याबाबतची कार्यवाही ठप्प झाली. त्यामुळे महाराष्ट्रभरातील भाविकांचे श्रध्दास्थान असलेल्या श्री क्षेत्र कपीलधारचा विकास करण्यासाठी शासनाने निधीची तरतूद करावी. यासोबतच बीड मतदारसंघात एकूण ३५० शाळा आहेत, त्या शाळांमधील ५९२ शाळा खोलींची अतिशय दुरावस्था झाली आहे म्हणजे त्या अक्षरशः पडतीला आल्या आहेत. ६३ वस्तीशाळांच्या इमारतींसाठी निधीची गरज आहे. तसेच ग्रामीण भागातील अनेक रस्ते आणि पूल दुरूस्तीला आले आहेत त्यांना मुख्यमंत्री ग्रामसडक योजना टप्पा ३ मधून मंजूरी देण्यात याव्यात. अनेक ग्रामपंचायत पान २ वर

> **विमानतळ होतय ही आनंदाची बाब पण....**
>
> बीडमध्ये विमानतळ होणार. या कामासाठी निधीची तरतूद करून याबाबतच्या कार्यवाहीला लवकरच सुरूवात करण्यात येईल अशी घोषणा याच आठवड्यात महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री तथा बीड जिल्ह्याचे पालकमंत्री ना.अजित दादा पवार साहेबांनी याचा मनस्वी आनंद आहे. त्याबद्दल ना.अजितदादांचे मन:पूर्वक आभार व्यक्त करतो. परंतु बीड शहरात रहिवास करणार्या ३ लाख लोकांना पाण्यावाचून कधीपर्यंत वेठीस धरायचे! योजना आणि पाणी उपलब्ध असतानाही नागरिकांचे हाल कधीपर्यंत होऊ द्यायचे? ३६ कोटी रूपयांची तातडीने तरतूद करून बीड शहराचा मुलभूत प्रश्न देखील प्राधान्याने मार्गी लावला पाहिजे अशी मागणी आ.संदीप क्षीरसागरांनी बीड शहराच्या जिव्हाळ्याचा असलेल्या पाणी प्रश्नावर केली. त्यासोबतच बीड येथील एमआयडीसीचा विकास करून बीड जिल्ह्याच्या औद्योगिक विकासाचा मार्गही सुकर करावा अशी आग्रही मागणी आ.संदीप क्षीरसागर यांनी सभागृहात केली.

# चौसाळा येथील अतिक्रमण हटवले

**चौसाळा | प्रतिनिधी**

**चौसाळा ता.जि. बीड येथील ग्रामपंचायत कार्यालयाच्या परिसरातील नागरिकांनी अतिक्रमण केलेल्या जागेवर शासनाच्या अतिक्रम हटाव मोहिमेनुसार अतिक्रमण केलेल्या जागेवर तसेच रस्त्यावरील उभारलेल्या अतिक्रमणावर मा. तहसीलदार साहेब बीड यांच्या आदेशानुसार गावातील अतिक्रमण काढण्याचे काम सुरू केले आहे दिनांक २० ०३ २०२५ रोजी सदर अतिक्रमण हटाव मोहिमेचा शुभारंभ करण्यात आला त्यानुसार ग्रामपंचायत परिसरातील अतिक्रमण असलेल्या जागेवर मशीनच्या सहाय्याने अतिक्रमण हटवण्यात आले.**



गावातील अनेक ग्रामस्थांनी ग्रामपंचायतच्या शासकीय जागेवर व मालकी नसलेल्या जागेवर रस्त्यावर ही अतिक्रमण केले आहे गावातील बस स्थानक परिसरातील जागेवर नागरिकांनी आपापले दुकाने थाटले आहेत सदर अतिक्रमण च्या जागेवर अनेकांनी अधिकृतपणे बांधकामे केले आहेत तरी सदरील अतिक्रमण पान २ वर

# गावकऱ्यांनी व्यक्त केले आ.प्रकाश सोळंके, जयसिंग सोळंके यांचे आभार

**वडवणी | प्रतिनिधी**

**आ.प्रकाश सोळंके यांच्या प्रयत्नातून व युवा नेते जयसिंग सोळंके यांच्या हस्ते उपळी येथील कुंडलिका धरणातून १९ मार्च २०२५ बुधवारी रोजी सकाळी ११ वाजता नदीपात्रात पाणी सोडण्यात आले.**



वडवणी तालुक्यातील उपळी येथील कुंडलिका धरणातून शेतकऱ्यांच्या हितासाठी पाणी सोडण्यात यावे अशी मागणी समस्त गावकऱ्यांच्या वतीने आ.प्रकाश सोळंके यांच्या कडे केली जात होती. या मागणीला प्रथम प्राधान्य देत आ.प्रकाश सोळंके यांनी संबंधित विभागाच्या अधिकाऱ्यांना सूचना दिल्या. अधिकारी यांनी धरण साईटवर जाऊन पाणीसाठा किती प्रमाणात शिल्लक आहे. याची चाचपणी केली आणि आ. प्रकाश सोळंके यांच्या सुचनेनुसार लागलीच प्रकिया सुरू केली. या धरणाचे पाणी नदीपात्रात सोडण्यासाठी खुद्द माजलगाव विधानसभा मतदारसंघाचे युवा नेते जयसिंग सोळंके यांनी उपस्थिती दर्शवुन नदी पात्रात पाणी सोडण्याचा कार्यक्रम पार पाडला. यावेळी शेतकरी आणि कार्यकर्त्यांनी त्यांचा व अधिकाऱ्यांचा यथोचित सत्कार केला. नदी पात्रात पाणी सोडल्याने धरणाखालील उपळी,लोनवळ बाबी,कुप्पा, सुलतानपुर, दुकडेगांव, चिंचाळा, धानोरा, राजेवाडी, पान २ वर

# पालिकेच्या २ लाख कर्मचाऱ्यांचे पगार रखडले!

**जालना | प्रतिनिधी**

**महाराष्ट्रात आज जवळपास ३८८ नगरपरिषदा व नगरपंचायती आहेत, यामध्ये अंदाजे १.५ ते २ लाख अधिकारी व कर्मचारी कार्यरत आहेत. इतका मोठा राज्य शासकीय व निमशासकीय कर्मचारी वर्ग असून आजही फेब्रुवारी महिन्याच्या वेतनाच्या प्रतीक्षेत आहे. याची ना नगरविकास विभागाला फिकीर पडली आहे ना नगरपरिषद प्रशासन संचालनालयाला!**

जकातीद्वारे मिळणारा महसूल हा नगरपरिषदांचा आर्थिक कणा असल्याने त्या आर्थिकदृष्ट्या सक्षम/ स्वावलंबी होत्या, परंतु शासनाने जकात बंद केली व त्याऐवजी वेतन व निवृत्तिवेतनासाठी सहायक अनुदान देणे सुरू केले. दर महिन्याला शासनाचा नगरविकास विभाग सहायक अनुदानाची ठोक रक्कम नगरपरिषद प्रशासन संचालनालयालय, मुंबई यांच्याकडे वर्ग करतो. व संचालनालयाकडून राज्यातील सर्व नगरपरिषदांना सहायक अनुदानाचे वितरण होते. शासनाकडून सहायक अनुदान प्राप्त झाल्यावरच नगरपरिषदांच्या अधिकारी-कर्मचाऱ्यांचे वेतन व निवृत्तिवेतनधारकांचे निवृत्तिवेतन अदा केले जाते. गेल्या अनेक वर्षांपासून सहायक अनुदान शासनाकडून वेळेवर मिळत नसल्यामुळे राज्यातील सर्व नगरपरिषदांचे वेतन दर महिन्याला उशिराने दिले जात आहे. तब्बल दोन दोन महिने वेतनास उशीर होत आहे. नगरपालिका अधिकारी-कर्मचाऱ्यांच्या दैनंदिन जीवनमानाचा खर्च, अपत्यांचा शैक्षणिक खर्च, वैयक्तिक कर्जाचे हप्ते, औषधपाणी इ. वर या दप्तर दिरंगाईमुळे दरमहा विपरीत परिणाम होत आहे. निवृत्तिवेतनधारकांचे हाल तर विचारूच नका! सध्या होळी व रमजान असे सर्वधर्मीयांचे सणासुदीचे दिवस असतानाही या सणाचा आनंद मात्र कर्मचारी वेतन न झाल्याने घेऊ शकत नाही. पान २ वर

# वडवणीचे कैलास पाटसकर यांचे दु:खद निधन

**वडवणी | प्रतिनिधी**



**येथील ज्येष्ठ समाजसेवक तथा प्रतिष्ठित व्यापारी कैलास गोपीनाथराव पाटसकर यांचे वयाच्या ५८ व्या वर्षी हृदयविकाराच्या तीव्र झटक्याने बुधवार दिनांक १९ मार्च २०२५ रोजी मध्यरात्री दु:खद निधन झाले असून त्यांच्या पार्थिवावर गुरुवारी वडवणी अमरधाम याठिकाणी अंत्यसंस्कार करण्यात आले. यावेळी उपस्थितांनी त्यांना साश्रू नयनांनी अखेरचा निरोप दिला.**

वडवणी येथील ज्येष्ठ समाजसेवक तथा प्रतिष्ठित व्यापारी कैलास गोपीनाथराव पाटसकर हे अण्णा या टोपण नावाने सर्वपरिचित असे व्यक्तिमत्व होते. समाजातील प्रत्येक सामाजिक, धार्मिक, अध्यात्मिक कार्यात त्यांचा हिरारीने अग्रक्रमी सहभाग असत. नामदेव शिंपी समाजातील एक कर्तबगार व कर्तव्यनिष्ठ व्यक्तिमत्व म्हणून त्यांच्याकडे पाहिले जात होते. आपल्याशी संबंधित असलेल्या प्रत्येकाच्या सुखदु:खात नेहमी ते धावून जात असत. कर्तुत्व, दातृत्व व नेतृत्व अशा सर्व ब्रीदांनी परिपूर्ण असे ते पान २ वर

# बीड जिल्हा मराठी पत्रकार परिषदेच्या अध्यक्षपदी विशाल साळुंके यांची फेरनिवड, गजानन मुडेगावकर नवे कार्याध्यक्ष






**मुंबई | प्रतिनिधी**

**बीड जिल्हा मराठी पत्रकार परिषदेच्या अध्यक्षपदी विशाल साळुंके यांची फेरनिवड करण्यात आली आहे. कार्याध्यक्ष म्हणून अंबाजोगाई येथील पत्रकार गजानन मुडेगावकर यांची नियुक्ती करण्यात आली आहे.. परिषदेचे अध्यक्ष मिलिंद अष्टीवकर यांनी आज ही घोषणा केली.**

बीड जिल्हा पत्रकार परिषदेच्या विद्यमान कार्यकारिणीची मुदत संपली आहे. त्यामुळे पुढील दोन वर्षांसाठी नवी कार्यकारिणी निवडण्यात आली आहे.आज काही पदांच्या नियुक्तया जाहीर करण्यात येत असल्या तरी उर्वरित पदाच्या नियुक्तया नवी कार्यकारिणी परिषदेशी चर्चा करून जाहीर करेल. नियुक्तया करताना नव्या चेहऱ्यांना संधी देण्यात आली आहे. जिल्हा अध्यक्ष विशाल साळुंके यांना पुन्हा संधी देण्यात आली आहे. कार्याध्यक्ष म्हणून गजानन मुडेगावकर, सरचिटणीस म्हणून गेवराई येथील सुभाष सुतार आणि कोषाध्यक्ष म्हणून परळी येथील पान २ वर

# महावितरणने चालवलेला विजेचा लपंडाव केव्हा थांबणार?

## सामाजिक कार्यकर्ते अ‍ॅड.मनोज संकाये यांचा सवाल

**परळी वै. | प्रतिनिधी**

**परळी शहरात गेल्या महिन्याभरापासून वारंवार वीजपुरवठा खंडित होत असून, यामुळे नागरिक व व्यावसायिक हैराण झाले आहेत. उन्हाची तीव्रता दिवसेंदिवस वाढत असताना वीजपुरवठ्यातील अनियमिततेमुळे उकाड्याने त्रस्त झालेल्या नागरिकांना अनेक अडचणींचा सामना करावा लागत आहे. मात्र, याकडे महावितरण दुर्लक्ष करत असल्याचा आरोप सामाजिक कार्यकर्ते अँड. मनोज संकाये यांनी केला आहे.**

परळी शहरातील नागरिक व व्यावसायिकांना नियमित वीजपुरवठा मिळावा, यासाठी महावितरणने तातडीने उपाययोजना कराव्यात, अशी मागणी त्यांनी केली आहे. त्यांनी स्पष्ट शब्दांत सांगितले की, ''वीज गेल्यानंतर दोन-दोन तास परत येत नाही. आली तरी किती वेळ टिकेल, याचा काहीही भरवसा नाही. या अनियमित वीजपुरवठ्यामुळे व्यावसायिकांचे मोठे नुकसान होत आहे. विशेषत: आईस्क्रीम, हॉटेल व इतर विजेवर अवलंबून असलेले व्यवसाय ठप्प होण्याच्या मार्गावर आहेत.'' तसेच, नागरिकांकडून भरमसाठ वीजबिले आकारली जात असताना, त्यांना २४ तास वीजपुरवठा मिळत नाही, ही गंभीर बाब असल्याचे त्यांनी नमूद केले. महावितरणचे वीज वितरण वेळापत्रक संपूर्ण कोलमडले असून, वीज केव्हा जाईल आणि केव्हा येईल, याचा काहीही ठावठिकाणा नाही. ''महावितरणने त्वरित हा विजेचा लपंडाव थांबवावा, अन्यथा मित्र मंडळाच्या वतीने महावितरण पान २ वर

# स्वयंसहायता बचत गटांच्या जिल्हास्तरीय विक्री व प्रदर्शनाचे मुख्य कार्यकारी अधिकारी जीवने यांच्या हस्ते उद्घाटन

**बीड| प्रतिनिधी**

**बीड जिल्हा परिषद व पंचायत राज विभागाच्या वतीने उमेद महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियानच्या वतीने दि. २० मार्च ते २४ मार्च २०२५ या कालावधीत जिल्हास्तरीय विक्री व प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले आहे. सदर प्रदर्शनाचे उद्घाटन बीड जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी आदित्य जीवने यांच्या हस्ते गुरुवार दिनांक २० मार्च रोजी करण्यात आले.**



जिल्हास्तरीय विक्री व प्रदर्शन २०२५ च्या या गुढीपाडवा महोत्सव, ईद बाजार आणि खाद्य जत्राचे फित कापून उद्घाटन करण्यात आले. यावेळी जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेच्या प्रकल्प संचालक श्रीमती संगीतादेवी पाटील, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी वासुदेव सोळंके उपमुख्य कार्यकारी अधिकारी पंचायत डॉ. ज्ञानोबा मोकाटे, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. उल्हास गंडाळ, शिक्षणाधिकारी (निरंतर) संजय पंचगल्ले यांच्या सह मान्यवरांची उपस्थिती होती. जिल्हा परिषदेच्या प्रांगणात उभारलेल्या २५ स्टॉलला सीईओ आदित्य जीवने यांचा सामान्य वाऱ्याने भेटी देऊन खाद्य पान २ वर

## उद्योजक लक्ष्मण मोरे यांना नगरभूषण, सतीश बनसोडे यांना सद्भावना तर सुजित ठाकूर (दिख्खत) यांना युवा गौरव पुरस्काराचे वितरण

# पायाभूत सुविधा मिळाल्याशिवाय उद्योग जगताला चालना मिळणार नाही-इंजि.भरत गित्ते

**अंबाजोगाई | प्रतिनिधी**

**आज मराठवाड्याची व विशेषत: ग्रामीण भागाची परिस्थिती सुधारली पाहिजे,ग्रामीण भाग अर्थसंपन्न झाला पाहिजे आणि बेरोजगारांच्या हाताला काम मिळाले पाहिजे ही प्रत्येकाची भावना आहे पण ग्रामीण भागात उद्योजकांना किंवा बाजारपेठेला जशा पायाभूत सुविधा लागतात तशा सुविधा मिळत नाहीत. उद्योग जगताला पायाभूत सुविधा मिळाल्या तरच रोजगाराची संधी आणि ग्रामीण भाग समृद्ध होईल अशी अपेक्षा जर्मनीचे उद्योजक व बीड जिल्ह्याचे भूमिपुत्र इंजि.भरत गित्ते यांनी व्यक्त केले.**

**अंबाजोगाई येथे दैनिक वार्ताच्या १७ व्या वर्धापन दिन सोहळ्यात ते बोलत होते. यावेळी वार्ता समूहाचा नगरभूषण पुरस्कार उद्योजक लक्ष्मणराव मोरे, सद्भावना पुरस्कार सतीश बनसोडे यांना तर युवा गौरव पुरस्कार युवा उद्योजक सुजितसिंह ठाकूर (दिक्खत)यांना प्रदान करण्यात आला.**

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी अंबाजोगाई पीपल्स बँकेचे चेअरमन राजकिशोर (पापा) मोदी हे होते तर प्रमुख अतिथी म्हणून अंबाजोगाई येथील अभियांत्रिकी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. बी.आय.खडकभावी केज च्या नगराध्यक्ष




सौ. सीताताई बनसोड, उद्योजक प्रतापराव पवार, केज येथील जनविकास परिवर्तन आघाडीचे संस्थापक हारूनभाई इनामदार, पुणे येथील अर्थोसर्जन डॉ. सचिन नागापूरकर, आय.एम.ए अंबाजोगाईचे अध्यक्ष डॉ.नवनाथ घुगे,सामाजिक कार्यकर्ते प्रा.ईश्वर मुंडे, मधुमेहतज्ञ डॉ.अतुल शिंदे यांच्यासह पुरस्कार प्राप्त लक्ष्मणराव मोरे यांचे चि .प्रवीण मोरे, सतीश बनसोडे, सुजित दिखत तसेच सत्कारमूर्ती इंजि.अमित राजेभाऊ लोमटे, इंजि.श्रीनाथ बापूराव गित्ते, इंजि.सहदेव नरसोबा केंद्रे, दैनिक वार्ता समूहाचे संपादक परमेश्वर गित्ते आदींची व्यासपीठावर उपस्थिती होती.मान्यवरांच्या हस्ते पुरस्कारांचे वितरण मोठ्या थाटात व उत्साहात संपन्न झाले. पुरस्कार प्राप्त मान्यवरांना स्मृतिचिन्हे, सन्मानपत्र,शाल, पुष्पहार, पुष्पगुच्छ व त्यांचेच कार्टूनरूपी चित्र देण्यात आले.यावेळी उद्योजक इंजि.भरत गित्ते यांनी परळी,लातूर, पुणे ते जर्मनी असा प्रवास सांगून त्यादरम्यानच्या काळातील आठवणींना उजाळा दिला तर विद्यार्थ्यांनी विचारलेल्या वेगवेगळ्या प्रश्नांना समर्पक आणि दिशादर्शक उत्तरे दिली. यावेळी बोलताना इंजि.गित्ते म्हणाले की, घरातील वातावरण तसे प्रतिकूल म्हणजे खूप सामान्य होते. घरात शिकलेले कोणीही नव्हते जेमतेम शिक्षण झालेले वडील होते. मुलांच्या संगोपनासाठी त्यांनी गाव सोडले आणि परळी गाठले. पान २ वर

This leaflet printed by the printer, publisher, owner Seema Bhimrao Maske at Jagmitra Printers And Sales Corporation Sumati Nagar, Jalana Road Beed printed here, Office Dainik Rajya Loktantra, Rajiv Gandhi Chowk Canol Road Beed, Tal. Dist.Beed 431122 (maharashtra) Published at. Editor Seema Bhimrao Maske,(mokashe) Executive Editor Ashok Nagorao Khade. Editors do not necessarily agree with the opinions expressed in the text. Court case in Beed tribunal. Email -rajyaloktanatra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स अँड सेल्स कॉर्पोरेशन सुमती नगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक कॅनॉल रोड बीड, ता.जि.बीड-४३११२२(महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक-सीमा भिमराव मस्के, (मोकाशे) कार्यकारी संपादक - अशोक नागोराव खाडे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. : ईमेल - rajyaloktantra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

# दुर्घटना नव्हे हत्याकांड !

## हिंजवडी जळीत घटनेत धक्कादायक माहिती समोर; टेम्पो ट्रॅव्हल्सला चालकानेच लावली आग



**पिंपरी | प्रतिनिधी**

**हिंजवडी येथे व्योम ग्राफिक्स या कंपनीच्या टेम्पो ट्रॅव्हलर वाहनाला आग लागून चार कर्मचाऱ्यांचा होरपळून मृत्यू झाला. बुधवारी (दि. १९) सकाळी झालेल्या या घटनेला धक्कादायक वळण मिळाले आहे. या वाहनावरील चालकाने कर्मचाऱ्यांबरोबरील वाद आणि पगार वाढ न झाल्याच्या रागातून हा प्रकार केल्याचे पोलिस तपासात उघड झाले आहे. चालकाने देखील गुन्ह्याची कबुली दिल्याने औद्योगिक क्षेत्रात खळबळ उडाली आहे. जनार्दन हंबर्डीकर (५६, रा. कोथरूड, मूळ रा. गोवा) असे आरोपी चालकाचे नाव आहे.**

पोलिस उपायुक्त विशाल गायकवाड यांनी दिलेल्या माहितीनुसार, आरोपी हिंजवडीतील व्योम ग्राफिक कंपनीच्या टेम्पो ट्रॅव्हलरवर चालक म्हणून काम करतो. दरम्यान, बुधवारी सकाळी सकाळी साडेआठ वाजता हिंजवडी येथिल विप्रो सर्कल फेज एकच्या परिसरात अचानक या टेम्पो ट्रॅव्हलरला आग लागली. या आगीत चार कर्मचाऱ्यांचा गाडीतच होरपळून मृत्यू झाला. तर, सहा कामागार गंभिररीत्या भाजले. तसेच, चार कर्मचाऱ्यांनी गाडीतून उड्या घेत आपला जीव वाचविला. प्रथमदर्शनी वाहनात शॉर्ट सर्किट झाल्याने ही आग लागल्याचा अंदाज पोलिसांनी वर्तविला होता. दरम्यान, पोलिसांनी केलेल्या तपासात चालक जनार्दन हंबर्डीकर यानेच जुन्या रागातून आणि कंपनी प्रशासनाच्या नाराजीतून हा प्रकार केल्याचे निष्पन्न झाले आहे. चालक जनार्दन हंबर्डीकर ट्रॅव्हल्सने प्रवास कर्मचाऱ्यांशी वाद होते. तसेच, दिवाळीत कंपनीने त्याचा पगारही कापला होता. याचा राग आरोपी हंबर्डीकर याच्या डोक्यात होता. त्याने व्योम ग्राफिक्स या आपल्या कंपनीतूनच मंगळवारी (दि. १८) एक लिटर बेंजिम सोल्युशन नावाचे केमिकल एक प्लास्टिकच्या बाटलीत भरून गाडीत आणून ठेवले. तसेच, कापडाच्या चिंध्या सीट खाली ठेवल्या. दुसऱ्या दिवशी म्हणजेच बुधवारी (दि. १९) सकाळी कर्मचाऱ्यांना आणण्यासाठी गेले असता वारजे येथे एक आगपेटी विकत घेतली. कर्मचाऱ्यांना घेऊन जात असताना हिंजवडी फेज वन परिसरात गाडी येताच आरोपीने गाडीचा ब्रेक दाबला. आगपेटीची काडी पेटवून कापडाच्या चिंध्यांना आग लावली. केमिकलमुळे काही वेळातच आगीचा भडका उडाला. चालकाने तातडीने गाडीतून बाहेर उडी मारली. त्यानंतर पुढील दुर्घटना घडली.

### बेशुद्ध पडल्याचे नाटक केल्याने संशय

आरोपी चालक हंबर्डीकर याला भाजून झालेल्या जखमा आणि तो दाखवत असलेल्या वेदना यात तफावत दिसत होती. किरकोळ जखमी होऊनही तो पोलिसांना पाहून वारंवार शुद्ध हरपल्याचे नाटक करत होता. ही बाब वरिष्ठ पोलिस निरीक्षक कन्हैय्या थोरात यांच्या लक्षात आली. त्यानंतर मात्र पोलिसांनी त्याच्यावर प्रश्नांची सरबत्ती केली. मात्र, तरीही तो उडवाउडवीची उत्तरे देत होता. दरम्यान, घटनास्थळाजवळील एका कंपनीच्या सीसीटीव्हीमध्ये चालक गाडीच्या सीटखाली काहीतरी पेटवत असल्याचे पुसटसे दिसून आले. त्यावरून पोलिसांचा संशय आणखी बळावला. पोलिसांनी कसून चौकशी केली असता आरोपीने गुन्ह्याची कबुली दिली.

### अपमानास्पद वागणूक जिव्हारी

आरोपी चालक हंबर्डीकर याला कंपनीतील इतर कर्मचारी अपमानास्पद वागणूक देत होते. त्याला दोन दिवसापूर्वी डब्यातील चपातीही खाऊन दिली नाही. तसेच दिवाळीत त्याचा पगार कापला होता. हा सर्व राग आणि खुन्नस डोक्यात असल्याने ही कृती केल्याचे आरोपीने कबूल केले आहे.

### ज्यांच्यावर रोष होता, तेच वाचले...

गाडीत बसलेल्या तीन जणांवर आरोपी चालकाचा राग होता. त्यांना इजा पोहचविण्यासाठी त्याने हा प्रकार केला. त्याला कंपनीच्या जवळ किंवा कंपनीच्या परिसरात गाडी पेटवायची होती. मात्र, गाडी थांबवून, आग लावून पळता येईल अशी जागा पाहून त्याने आग लावली. मात्र, ज्या तिघांवर राग होता, ते तीन कर्मचारी वाचल्याचे पोलिस सांगत आहे. ज्यांचा या सर्व गोष्टीशी काहीही संबंध नव्हता, असे चारजण या घटनेत होरपळून मृत्यू पावले आहेत.

## विद्यापीठाच्या उन्हाळी सत्र परीक्षा २५ मार्चपासून होणार सुरू



**पुणे | प्रतिनिधी**

**सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या शैक्षणिक वर्ष २०२४-२५ मधील पदविका, पदवी आणि पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमाच्या नियमित, अनुशेष लेखी आणि प्रात्यक्षिक परीक्षा २५ मार्चपासून सुरू होणार आहेत. सर्व मान्यताप्राप्त अभ्यासक्रमांच्या परीक्षांची वेळापत्रके विद्यापीठाच्या '...' या संकेतस्थळावर टप्प्या-टप्प्याने प्रसिद्ध करण्यात येत आहेत.**

सर्व विद्याशाखांमधील मान्यताप्राप्त अभ्यासक्रमांच्या पदविका परीक्षा, मान्यताप्राप्त पारंपारिक अभ्यासक्रमांतील (कला, वाणिज्य आणि विज्ञान) पदवीस्तरावरील प्रथम वर्षांच्या परीक्षा, तसेच विधी अभ्यासक्रम पदवी स्तरावरील प्रथम वर्षाच्या एलएलबी, बीए एलएलबी परीक्षांचे आयोजन महाविद्यालय स्तरावर करण्यात येईल. पारंपारिक अभ्यासक्रमांतील पदवीस्तर प्रथम वर्ष आणि विधी अभ्यासक्रम प्रथम वर्ष वगळून या अभ्यासक्रमांच्या उर्वरित वर्षे, पदव्युत्तर स्तरावरील अभ्यासक्रमांची सर्व वर्षे, पदवी आणि पदव्युत्तर व्यावसायिक अभ्यासक्रमांची सर्व वर्षांची अनुरूप सत्र परीक्षांचे आयोजन विद्यापीठ स्तरावर करण्यात येणार आहे. परीक्षेच्या दृष्टिकोनातून महाविद्यालयात काटेकोर नियोजन करण्यात यावे, बैठक व्यवस्था सुयोग्य असावी, विद्यार्थ्यांसाठी पिण्याच्या पाण्याची आणि वस्तू ठेवण्याची व्यवस्था करावी, अशी सूचना विद्यापीठाने महाविद्यालयांना दिल्या आहेत. विद्यार्थ्यांनी परीक्षा सुरू होण्यापूर्वी अर्धा तास अगोदर परीक्षा केंद्रावर हजर राहणे अनिवार्य आहे. संबंधित महाविद्यालयांनी याबाबत विद्यार्थ्यांना पूर्वसूचना द्यावी, असेही विद्यापीठाने स्पष्ट केले आहे.

## उरळी कांचन सर्वात मोठे टर्मिनल, तर चार रेल्वे स्टेशनचा विकास

### रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव यांनी संसदेत केली मोठी घोषणा

**पुणे | प्रतिनिधी**

**गेल्या काही काळापासून पुणे रेल्वे स्टेशनवरून लांब पल्ल्याच्या गाड्या वाढवण्याची मागणी सातत्याने केली जात आहे. संसदेचे अधिवेशन सुरू असून या अधिवेशनात याविषियी अनेक खासदारांनी रेल्वे मंत्र्यांकडे पुणे शहराचा वेगाने होत असलेला विकास लक्षात घेता पुण्यातून लांब पल्ल्याच्या रेल्वे गाड्या सोडण्याची मागणी केली. या प्रश्नावर उत्तर देताना रेल्वे मंत्री अश्विनी वैष्णव यांनी मोठी घोषणा केली आहे.**



उरळी कांचन येथे सर्वांत मोठे टर्मिनलचे काम हाती घेण्यात आले आहे, तसेच पुण्यातील चार रेल्वे स्टेशन विकसित करण्यात येणार असल्याची माहिती वैष्णव यांनी संसदेत या प्रश्नावर उत्तर देताना दिली. ते बुधवारी या विषयावर संसदेत बोलत होते. पुणे शहर व परिसर हा समृद्ध बनला आहे. पुणे हे शैक्षणिक हब बनले आहे. त्यामुळे पुण्यासाठी देशातून गाड्यांची मागणी नेहमी येते. त्यामध्ये जबलपूर, उत्तर प्रदेश, बिहार या भागातून पुण्यासाठी रेल्वे गाड्या वाढविण्याची मागणी केली आहे. पुण्यातून रेल्वे गाड्या वाढवण्यासाठी तेथील रेल्वे स्टेशनचा विकास करण्याचे काम हाती घेतले आहे. त्यामध्ये चार स्टेशनचा विकास केला जात असल्याचे केंद्रीय रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव म्हणाले.

### प्रवाशांना होणार फायदा

हडपसर टर्मिनल, शिवाजीनगर रेल्वे स्टेशनचा विकास करण्यात येत आहे. उरळी कांचन येथे मोठे टर्मिनल उभे करण्याचे काम सुरू आहे. पुणे रेल्वे स्टेशनवर गाडी उतरून ती गाडी देखभाल दुरुस्तीसाठी उरळी येथे जाईल. ती गाडी पुन्हा पुणे रेल्वे स्टेशनमार्ग प्रवास करेल. यामुळे स्टेशनच्या विकासात गाड्यांची संख्या वाढविण्यात येईल, याचा मोठा फायदा प्रवाशांना होणार असल्याचे सांगण्यात आले आहे.

## शिवनेरी, लेण्याद्रीसह चार रोपवे प्रकल्पांना चालना मिळणार

**जुन्नर | प्रतिनिधी**

**शिरूर लोकसभा मतदारसंघातील पर्वतमाला योजनेअंतर्गत शिवनेरी, लेण्याद्रीसह चार रोप वे प्रकल्पांना जागा उपलब्धता, आर्थिक सहभाग यासाठी राज्य मंत्रिमंडळाने मान्यता दिली आहे. यामुळे गेल्या अनेक वर्षांपासूनची मागणी असलेल्या रोपवे प्रकल्पांना चालना मिळणार आहे.**

शिरूर लोकसभा मतदारसंघातील पर्यटनाला चालना मिळावी यासाठी शिवनेरी, लेण्याद्री, भीमाशंकर आदी ठिकाणी रोपवे उभारण्याची मागणी खासदार डॉ. अमोल कोल्हे यांनी केंद्रीयमंत्री नितीन गडकरी यांच्याकडे केली होती. त्यावेळी केंद्रीयमंत्री गडकरी यांनी राज्य शासनाकडून प्रस्ताव आल्यास पर्वतमाला योजनेंतर्गत रोपवे बांधण्यासाठी निधी मंजूर करण्याचे मान्य केले होते. त्यानंतर खासदार डॉ. कोल्हे यांनी शिरूर लोकसभा मतदारसंघातील शिवनेरीसह विविध रोपवेचे प्रस्ताव केंद्रीय रस्ते परिवहन व महामार्ग मंत्रालयाकडे पाठवण्याबाबत राज्य शासनाकडे सातत्याने पाठपुरावा केला होता. त्यानुसार राज्य शासनाने परिशिष्ट -अ नुसार पुणे जिल्ह्यातील श्री निमगाव खंडोबा, सिंहगड व जेजुरीसह एकूण १६ आणि परिशिष्ट-ब नुसार शिवनेरी किल्ला, अष्टविनायक लेण्याद्री, भीमाशंकर ज्योतिर्लिंग व दाऱ्याघाट यासह एकूण २९ ठिकाणी रोपवे बांधण्याचा प्रस्ताव केंद्रीय रस्ते परिवहन व महामार्ग मंत्रालयाकडे पाठविला होता.



या संदर्भात खासदार डॉ. कोल्हे म्हणाले की, शिरूर लोकसभा मतदारसंघात शिवनेरी, लेण्याद्री, भीमाशंकर, दाऱ्याघाटसह अनेक पर्यटनस्थळं आहेत. या पर्यटनस्थळांचा विकास झाला तर पर्यटनाला मोठी चालना मिळेल आणि त्यातून तरुणांना रोजगार मिळेल. या भागाच्या अर्थकारणाला गती मिळावी यासाठी शिरूर लोकसभा मतदारसंघातील शिवनेरी, लेण्याद्रीसह विविध ठिकाणी रोपवे उभारण्याची मागणी सातत्याने करीत होतो. या मागणीला केंद्रीयमंत्री गडकरी आणि राज्य सरकारने दिलेल्या प्रतिसादाबद्दल येथील जनतेच्यावतीने आभार व्यक्त केले.

## मटका किंग नंदु नाईकवर एमपीडीए अंतर्गत कारवाई; वर्षभरासाठी नागपूर कारागृहात ठेवण्याचे आदेश



**पुणे | प्रतिनिधी**

**शहरातील शुक्रवार पेठेत मटका अड्डा चालविणारा सराईत नंदू नाईक याच्याविरुद्ध पोलीस आयुक्त अमितेश कुमार यांनी झोपडपट्टी दादा प्रतिबंधक कायद्यान्वये (एमपीडीए) कारवाई करण्याचे आदेश दिले. न्यायालयाच्या आदेशाने त्याला वर्षभरासाठी नागपूर कारागृहात स्थानबद्ध करण्यात येणार आहे.**

पुणे शहरात मटका, जुगार अड्डा चालविल्याप्रकरणी नंदकुमार उर्फ नंदू बाबुराव नाईक (७२, शुक्रवार पेठ) याच्याविरुद्ध खडक पोलीस ठाण्यात ३६ गुन्हे दाखल आहेत. अनेक तरुणांना जुगार खेळण्याचा नाद नाईक याने लावला होता. जुगाराच्या नादामुळे अनेक जण कर्जबाजारी झाले होते. नाईक याच्या अड्ड्यावर पोलिसांनी वेळोवेळी कारवाई केली होती. मात्र, त्याच्या वर्तणुकीत सुधारणा झाली नव्हती. त्याने छत्रपती शिवाजी रस्त्यावरील एका इमारतीत जुगार अड्डा सुरू केला होता. जुगार अड्ड्यावर पोलिसांनी यापूर्वी छापे टाकले होते. त्याच्याविरुद्ध एमपीडीए कारवाई करण्याचा प्रस्ताव खडक पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक शशिकांत चव्हाण यांनी तयार केला होता. या प्रस्तावाची पडताळणी करुन पोलीस आयुक्त अमितेश कुमार यांनी त्याच्याविरुद्ध कारवाई केली. त्याला वर्षभरासाठी नागपूर कारागृहात ठेवण्याचे आदेश देण्यात आले. पोलीस उपायुक्त संदीपसिंग गिल, सहायक आयुक्त अनुजा देशमाने यांच्या मार्गदर्शनाखाली वरिष्ठ पोलीस निरीक्षक शशिकांत चव्हाण, गुन्हे शाखेच्या पोलीस निरीक्षक शर्मिला सुतार, मनोजकुमार लोंढे, सहायक निरीक्षक हर्षल कदम, संतोष थोरात, चंद्रशेखर खरात, इरफान नदाफ यांनी ही कारवाई केली.

### मोक्कानुसारही झाली होती कारवाई

मटका किंग नंदू नाईक या नावाने तो शहर व ग्रामीण भागात ओळखला जात होता. त्याच्यावर चार वर्षांपूर्वी एका खून प्रकरणात बंडू आंदेकर टोळीवर मोक्का कारवाई केली होती. तेव्हा नंदू नाईक याची टोळीला आर्थिक रसद पुरवत असल्यावरून मोक्का कारवाई झाली होती. मात्र नंतर हा मोक्काच न्यायालयात टिकला नाही. त्यापूर्वीच नंदू नाईकने न्यायालयातुन जामीन मिळवला होता.

## श्रीक्षेत्र कानिफनाथ गडावर रंगला आनंदोत्सव

**सासवड | प्रतिनिधी**

**बोपगाव (ता. पुरंदर) येथील लाखो भाविकांचे श्रद्धास्थान असलेल्या श्रीक्षेत्र कानिफनाथ गडावर बुधवारी (दि. १९) रंगपंचमी (आनंदोत्सव यात्रा) पारंपरिक पद्धतीने उत्साहात साजरी झाली. गडावर आणि मंदिराच्या शिखरावर भाविकांनी रंगांची उधळण केली.**



फाल्गुन कृष्ण पंचमी रंगपंचमीनिमित्त बुधवारी पहाटे मंदिरात श्री नवनाथ देवस्थान पंच कमिटी ट्रस्टच्या वतीने दही, दूध आणि पंचामृताचा अभिषेक व पूजा करण्यात आली. दुपारी १२ वाजता नाथांची आरती झाली. त्यानंतर १२.३० वाजता पारंपरिक वाद्यांच्या गजरात प्रथम देवांच्या अंगावर रंग शिंपण्यात आला. मंदिराच्या शिखरावरून भाविकांच्या अंगावर रंगांची शिंपण करण्यात आली. या वेळी मंदिर परिसरात मोठ्या प्रमाणावर भाविकांची गर्दी होती. सर्व परिसर रंगांनी रंगून गेला होता. ही यात्रा उत्साहात पार पडली. सकाळी ९ वाजता बोपगाव येथून नामदेव कुंभार यांच्या घरातून पालखी व काठीचे पूजन होऊन पालखी तसेच काठी भैरोबा मंदिरात आली. तेथून पालखी आणि मानाची शिखर काठी वाजतगाजत कानिफनाथ मंदिरावर गेली. त्यानंतर सासवड, भिवरी, गराडे, चांबळी, औताडवाडी, होळकरवाडी, वडकी, उरुळी देवाची येथील मानाच्या शिखर काठ्यांनी रंगपंचमी आनंदोत्सव यात्रेत सहभाग घेतला. रंगपंचमीनिमित्त अन्नदान सेवा ह.भ.प. बाजीरावनाना औताडे आणि मित्रपरिवार तसेच ग्रामस्थांनी गजगोपाळ जेऊ घातले. या वेळी सरपंच ज्योती फडतरे, नवनाथ देवस्थान पंचायत कमिटी ट्रस्टचे अध्यक्ष ज्ञानोबा फडतरे, उपाध्यक्ष दीपक फडतरे, सचिव जयवंत फडतरे, खजिनदार नागेश फडतरे, विश्वस्त प्रकाश फडतरे, सुरेश फडतरे, प्रकाशनाना फडतरे, महादेव फडतरे, नितीन फडतरे, सोनबा फडतरे, मंगेश फडतरे, रमेश फडतरे, शिवाजी जगदाळे, दयानंद फडतरे, तानाजी फडतरे, योगेश फडतरे, संदीप फडतरे, दादासाहेब जगदाळ, राम फडतरे, पोलिस पाटील विनायक गायकवाड, व्यवस्थापक संतोष गोफणे आदींसह श्री नवनाथ देवस्थान पंच कमिटी ट्रस्ट आणि ग्रामस्थ, बोपगाव यांनी यात्रा यशस्वी होण्यासाठी नियोजन केले. यात्राकाळात सासवडचे पोलिस निरीक्षक ऋषिकेश अधिकारी यांच्या मार्गदर्शनाखाली सहायक पोलिस निरीक्षक वैभव सोनवणे, १० पोलिस कर्मचारी, ९ ट्राफिक वॉर्डन आदींनी यात्रेमध्ये कोणताही अनुचित प्रकार घडू नये, यासाठी चोख बंदोबस्त ठेवला होता. पुरंदरचे वैद्यकीय अधिकारी विक्रम काळे यांच्या मार्गदर्शनाखाली डॉ. स्वप्नाली शिंदे, डॉ. नीलिमा निचित, डॉ. संतोष मर्ढेकर, आरोग्यसेविका सुजाता कटके, आशा स्वयंसेविका सुरेखा लोणकर, अश्विनी शिंदे आदींनी भाविकांना आरोग्यसेवा उपलब्ध करून दिली होती.